प्रकरण तिसरे

# 'दर्पण'मधील लेखनाचा सामाजिक अभ्यास

## प्रकरण तिसरे

## `दर्पण` मधील लेखनाचा सामाजिक अभ्यास

### प्रास्ताविक

बाळशास्त्री जांभेकरांची अष्टपैलू बुध्दिमत्ता, समाजोध्दाराची दृष्टी आणि स्वदेशोन्नतीची आत्यंतिक कळकळ, त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय व धार्मिक अशा विविध क्षेत्रांतील त्यांनी केलेल्या लेखनावरून स्पष्ट होते. जीवनविकासाचे आणि सामाजिक उन्नतीचे प्रमुख

साधन म्हणजे शिक्षण असे त्यांना प्रथमत:च जाणवले होते. इंग्रजी राज्यकर्त्यांचे उदाहरण त्यांच्यासमोर होते. म्हणून सर्वांगीण जीवन विकासासाठी शिक्षण ही त्यांना गरजेची गोष्ट वाटली, आणि त्याचा त्यांनी पुरस्कार केला. ` विद्या हे बळ आहे ` असे सांगून त्यांनी सत्य, नीति, सदाचार, उद्योगपरता या मूल्यांच्या संदर्भात समाजाला उत्तेजन देण्याचा प्रयत्न केला. शिक्षकांद्वारे सामाजिक जागृती होऊ शकेल अशी जांभेकरांची श्रध्दा असल्यामुळे नवीन शिक्षक घडविण्यासाठी त्यांनी ` नॉर्मल स्कूल ` ची स्थापना केली. अज्ञानात बुडालेल्या समाजाला ज्ञान देण्यासाठी जे जे मार्ग अवलंबिता येतील ते ते मार्ग त्यांनी अवलंबिले. समाजात असलेल्या तत्कालीन रूढी, परंपरा, अंधश्रध्दा व समजुती यांवर त्यांनी प्रहार केला. विधवाविवाह बंदी सारख्या दुष्ट रूढीविरूध्द त्यांनी आवाज उठविला व लेखणीही चालविली. स्त्री-पुरूष भेद न मानता स्त्रियांना देखील शिक्षण देऊन जागृत केले पाहिजे, यासाठी त्यांनी प्रयत्न केले. ग्रहणाचेवेळी सुतक पाळणे, दानधर्म करणे या समजुती वेडगळ व अज्ञानजन्य कशा आहेत हे त्यांनी गणित, खगोल व ज्योतिषशास्त्राच्या आधारे व्याख्याने देऊन सांगितले. तसेच इंग्रजी राज्याचे संकट राजकीय व लष्करी उपायांनी आता उलटून टाकता येणार नव्हते. प्रथम आपण पाश्चात्य संस्कृति तिच्या शास्त्रीय अंगोपांगासहित समजून घेतली पाहिजे व त्या योगे आपल्या देशाचा विकास केला पाहिजे ही बाळशास्त्र्यांची धारणा होती. शास्त्राचे व जगाबद्दलचे अज्ञान हे आपल्या राष्ट्राचे प्रमुख दोन दोष काळाने वाढत आले होते. शिक्षणानेच आपल्या देशाचे मागासलेपण दूर करता येईल हे बाळशास्त्र्यांना जाणवले होते. शाळांची निर्मिती करून, पाश्चात्य शिक्षणाची कास धरून, परदेशात जाऊन तेथील चांगल्या गोष्टी शिकून आपण शहाणे झालो पाहिजे. तरच आपल्या देशातील अंधकार आणि दारिद्र्य हटेल, असे बाळशास्त्र्यांनी

कृतीने आणि उक्तीने दाखवून दिले. बाळशास्त्र्यांनी सुरू केलेल्या `दर्पण` या नियतकालिकातील लेखनावरून त्यांच्या व्यक्तिमत्वाचे आणि विचाराचे दर्शन घडते. या लेखनात सामाजिकता कशी प्रकट झाली आहे, त्याचा विचार करू.

नियतकालिक : समाज जागृतीचे महत्वाचे साधन.

बाळशास्त्र्यांच्या आयुष्याचा आरंभ समाजाचा मूलभूत व आद्य प्रश्न जो शिक्षण त्याच्या प्रवर्तक संस्थेपासून झाला. त्यामुळे शैक्षणिक बाबतीत त्यांना जेवढे करता येईल तेवढे त्यांनी केले. समाजजागृती आणि शिक्षणप्रसार यांसाठीच तर त्यांनी `दर्पण` पत्राची निर्मिती केली. पाश्चात्य विद्यांचा, नव्या ज्ञानाचा लोकांना परिचय करून द्यावा, त्यांचा अभ्यास व्हावा व त्याद्वारे देशाची उन्नती आणि कल्याण व्हावे अशा हेतूनेच `दर्पण` चा प्रपंच मांडण्यात आला होता. `दर्पण` पत्र सुरू झाले तेव्हा वृत्तपत्रांचा प्रसार, विशेषत: भारतीय भाषांतील वृत्तपत्रांचा प्रसार, फारसा झाला नव्हता. त्यामुळे बातम्यांपेक्षा लोकांना काही-तरी सांगण्याला, समजाऊन देण्याला अधिक महत्व होते. जनतेला ज्ञान देऊन प्रबोधन करणे हा `दर्पण` चा जन्महेतूच होता. जनता जुनी होती पण राजवट नवी होती. तिने प्रचलीत केलेले शिक्षण, कायदेकानू नवीन होते. म्हणून जनतेला मार्गदर्शनाची आवश्यकता होती. नियतकालिकाचे स्वरूप सामर्थ्य आणि पध्दती यांची एतद्देशियांना माहिती नव्हती. मुंबई बाहेर-च्या मुलुखात तर ही गोष्ट विचारातच आली नव्हती. नियतकालिकाचा प्रकार आपल्याकडे प्राचीनकाळी शोधूनही सापडणार नाही. तो नवा प्रकार समजून देण्यासाठी, छापखान्याची माहिती देण्यासाठी आणि नियतकालिकां-पासून जे फायदे होतात, त्या विषयीची चर्चा ६ जानेवारी, १८३२ च्या

`दर्पण` च्या पहिल्याच अंकात केली होती. "जा देशातून आपले सांप्रतचे शासकर्ते एथे आले, त्या देशात ते एथे आल्याचे पूर्वी फार दिवसांपासून या आश्चर्यकारक छापयंत्राची कृत्ये चालू होती, त्यांपासून मनुष्यांचे मनांतील अज्ञानरूप अंधकार जाऊन त्यावर ज्ञानरूप प्रकाश पडला.. जा जा देशामध्ये अशो लेखांचा प्रचार झाला आहे, तेथे तेथे लोकांचे आंतर व्यवहारांमध्यें तसेंच बाह्यव्यवहारांमध्ये शाश्वत हित झालें आहें. यांपासून बहुत वेळ विद्यांची वृध्दि झाली आहे. लोकांमध्ये नीति रुपास आली आहे. केव्हां केव्हां प्रजाना राजाचे आज्ञेत वर्तावे आणि राजानीही त्यांवर जुलूम करूं नये अशा गोष्टी यां पासून घडल्या आहेत. अलीकडे कित्येक देशात धर्मनीति आणि राज्यनीति यांत जे चांगले आणि उपयोगी फेरफार झाले आहेत त्यांसही थोडे बहुत हे लेख उपयोगी पडले आहेत."(१)

नियतकालिक हे ज्ञानप्रसाराचे अमोघ साधन आहे. त्यामुळे लोकांमध्ये आचारसंहिता वाढण्यासाठी, व्यक्तिमत्वाचा विकास होण्यासाठी, राजांच्या अन्यायाला पायबंद घालून जनतेचे कल्याण करण्यासाठी, विद्येच्या वृध्दीसाठी, आणि समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी पाश्चात्य राष्ट्रात नियतकालिकांचे लेखन उपयोगी पडलेले आहे असे `दर्पण`कारांनी म्हटले आहे. "लोकस्थिती, धर्मरीती आणि उपयोगी फेरफार घडवून आणणे" हे नियतकालिकाचे कर्तव्य आहे अशी त्यांची धारणा होती. या बाबतीत त्यांच्या डोळ्यासमोर पाश्चात्य विद्येच्या प्रभावाने जागृत झालेला बंगाल प्रांत आणि त्याचे नेते राजा राममोहन रॉय हे होते. पहिल्याच अंकात म्हटले आहे, "विद्येपासून आणि सरळ बुध्दी पासून जी फळे होतात त्यांचे यथार्थ ज्ञान युरोपियन लोकांशी बहुत दिवस सलगीचें संघट्टन पडल्यामुळें बंगालचे लोकांस झालें आहे. या गोष्टी त्यांचे मनात पक्केपणी ठसून त्याणी स्वदेशीय लोकांचे विद्याभ्यासाकरितां प्रयत्न केले, आणि ते

त्यांचे यत्न सफल झाले, तेथे विद्या, वाढण्यास आणि सरळ बुध्दि होण्यास कारणें मुख्यत्वे करून दोन, एक सर्व विद्यालय म्हणजे सर्व विद्यांची शाळा, आणि दुसरें तेथे जी बहुत तद्देशीय वर्तमानपत्रे छापून प्रसिध्द होतात तीं. बरें असेच उपाय एथे केले तर अशीं फळे न होतील कीं काय ?" (२)

बाळशास्त्र्यांनी बंगाल प्रांतातील पुढारलेपणाचे उदाहरण देऊन आपणाही विद्येची कास धरून मुंबई प्रांताला प्रगतीकडे न्यायला हवे अशी पहिल्याच अंकात त्यांनी एतद्देशीयांना जाणीव करून दिली आहे. तसेच आपल्या मुलांना शिकविण्यासाठी फार चांगली मंडळी येथे आली आहे. एल्फिन्स्टन्ही आपल्याकडे विद्यांचा प्रसार करण्यासाठी येणार आहे. त्यामुळे 'दर्पण 'कारांनी 'विद्या व्यवहाराचे द्वार ' असे एक वर्तमानपत्र सुरू व्हायला हवे, जेणेकरून एतद्देशीयांना विद्येची परिपूर्ण माहिती देऊ शकेल, अशा स्वरूपाची अपेक्षा व्यक्त केली आहे. नियत-कालिकांपासून जवळच्या व दूरच्या प्रदेशातील घटना समजतील, विद्यांपासून उत्पन्न होणारे विचार समजतील, लोकांना उद्योगी बनवता येईल, त्यांची जिज्ञासू वृत्ती वाढीस लावता येईल आणि एकंदरीत देशाच्या प्रगतीस नियतकालिक फार उपयोगी पडू शकेल अशी बाळशास्त्र्यांची विचार प्रणाली होती.

त्यावेळी पुस्तकांचा, वृत्तपत्रांचा आणि शाळांचा प्रसार झालेला नसल्यामुळे अल्प किंमतीत वृत्तपत्रदेऊन जी काही वाचणारी मंडळी आहे त्यांचे व त्यायोगे समाजाचे मतपरिवर्तन करण्याचा आणि त्यांना शिक्षणा-भिमुख बनविण्याचा प्रयत्न 'दर्पण' कारांचा होता. पाश्चात्य विद्येचे ज्ञान एथील लोकांना मिळावे म्हणून प्रयत्न केला जात होता."एल्फिन्स्टनने तर 'शिक्षा मंडळी' ची स्थापना करून चांगल्या विद्येची मूळ पुस्तके या

देशात निर्माण करणे, शाळा काढून लोकांना उपयोगी विद्या शिकविणे, हा उपक्रम चालू केला आहे. त्यामुळेच मुंबई प्रांतातील ५६ शाळांत ३००० मुले शिक्षण घेत आहेत. मुंबई प्रांतातील शाळा तर फार चांगल्या वाढल्या असून प्रत्येक शाळेत १२५ मुले आहेत. त्यामुळे इंग्रजांचा हा ज्ञान-दानाचा प्रयत्न सफल होत असून एतद्देशीयांनी त्यांना मदत करावी आणि स्वत:चा विकास करावा ` असे आवाहनही ` दर्पण ` कार करतात.

विद्या.
------

` दर्पण ` कार विद्याविषयक विचार पटवून देत असताना मोठ-मोठ्या विद्वानांची उदाहरणे आणि त्यांच्या वक्तव्याचे दाखले देतात. ` विद्या हे बळ आहे ` हे लॉर्ड बेकनचे उद्‌गारच आपल्या लेखाला बाळशास्त्रींनी शिर्षक दिलेले आहेत. म्हणून जांभेकर म्हणतात, ` या वाक्याचा खरेपणा या काळात स्पष्टपणे दिसून येतो. विद्येचा प्रकाश मुळातच पूर्व देशातून पश्चिम देशावर पडला हे सिध्द झाले आहे. हजारो वर्षांपासून इथल्या लोकांना विद्येची मूळ स्वरूपे माहीत होती. म्हणूनच आज युरोपखंडात कला-कौशल्ये भरभराटीस आली आहेत. परंतु या देशामध्ये इतकी वर्षे गेली तरी त्यांची वाढ झाली नाही. विद्येचे प्रमुख उपयोग येथील लोकांना समजलेच नाहीत. कारण या देशातील विद्वान लोकांनी न्याय व वेदांत या शास्त्राकडे जेवढे लक्ष दिले, तेवढे लक्ष भौतिक विद्यांकडे व कलाकौशल्या-कडे दिले नाही. विद्या ही फक्त धर्माच्या उपयोगी आहे. तिचा उपयोग मानवाच्या व्यवहारी जीवनात कांहीच नाही, असे आपल्या प्राचीन विद्वानांचे मत होते. त्यामुळे इतिहास, भूगोल, विज्ञान यांकडे येथील लोकांनी दुर्लक्ष केले. पाश्चात्य लोक भौतिक विद्यांमध्ये पारंगत आहेत, म्हणून ते आमच्या पेक्षा पुढे आहेत. आणि आम्ही मात्र त्यांच्यापेक्षा खूपच मागे आहोत.

काळ जसा बदलत जातो, तस-तसे जुन्या चालो-रीति सोडून, नव्याचा स्वीकार आपोआप होत जातो. या देशाच्या स्थितीत इंग्रज आल्यापासून गेल्या वीस वर्षांत मोठा बदल घडून आला आहे आणि हे आपल्या देशास आवश्यकच आहे. म्हणून या देशातील लोकांनी आपले लक्ष संसारोपयोगी कलाकौशल्याकडे यावे. त्याचा व्यवहारात उपयोग कसा होतो हे प्रथमत: शिकावे. पाश्चात्य लोक आमच्या पुढे का ? आणि आमची दुर्दशा का झाली ? याची कारणे शोधावीत, आपल्यातील दोष काढून आपल्या उन्नतीचे मार्ग स्वीकारावेत, यासाठी लॉर्ड ब्रहमचे पुढील उद्‌गार दिलेले आहेत. ` विद्येचे व्यवहारातील उपयोग मोठया कामाचे आहेत आणि आपले ज्ञान वाढविल्याने द्रव्य मिळण्यात आणि सुखात कांही स्वार्थ होणार नाही, असा मनुष्य कोणी नाही. `

बाळशास्त्र्यांनी एकूण शिक्षणालाच अनुलक्षून ` विद्या ` हा शब्दप्रयोग त्याकाळात केलेला आहे. त्यामध्ये भूगोल, इतिहास, विज्ञान, भाषा आणि साहित्य इ. सर्व शास्त्र व कला यांचा समावेश होतो. अनेकविध ज्ञानशास्त्रांची त्यावेळी नुकतीच ओळख होऊ लागली होती. आपल्याकडे ह्या ज्ञानशाखा अपरिचित होत्या. त्यामुळे एकंदरीत सर्वच ज्ञानाला त्यांनी ` विद्या ` ही संज्ञा वापरली.

हिंदुस्थानची संस्कृतीच मुळात कृषिप्रधान, स्थितीशील, अंधश्रध्दाळू, आणि दैववादी असल्यामुळे शिक्षणासारख्या नव्या गोष्टीचा अंगीकार करायला येथील लोक आपणाहून येणे शक्य नसल्याने, त्यांचे मनपरिवर्तन करून नवकार्यास प्रवृत्त करणे, हे जांभेकरांनी महत्वाचे मानले. विद्वानांची मते, इंग्रजी वृत्तपत्रांच्या प्रगतिनिर्देशक बातम्या त्यांनी येथील जनतेसमोर ` दर्पण ` मधून मांडल्या. कलकत्यातील ` रिफार्मर ` वृत्तपत्रातून विद्ये-विषयक स्पष्ट केलेले संपादकाचे मतही जांभेकरांनी पुढीलप्रमाणे उद्‌धृत केले

आहे. विद्येमुळे देशास श्रेष्ठपणा येतो असा त्याचा मथितार्थ आहे.

" आता समय असा आला आहे कीं, सर्व राज्यांतील लोकांनी सज्ञान दशेस चढावें, किंवा तिरस्कार आणि दुःख यांत पडावें, या काळात संपत्ति म्हणजे सज्ञानपणा आणि विद्या व कला यांचा अभ्यास, म्हणजे ती यापासूनच प्राप्त होत्ये, असें झाले आहे. परंतु सांप्रत संपत्ति आणि विद्या यांचा परस्पर संबंध साधारण पाहाणाराचे दृष्टीसही उघड येतो. विलायतेंतील लोकांमध्ये विद्येचा प्रसार झाला, त्यामुळें त्या देशास किती श्रेष्ठपणा प्राप्त झाला, याचाच आम्ही विचार करून पाहूं. विलायतेंतील जा चमत्कारीक यंत्रांनी द्रव्य मिळण्यास उपाय बहुत झाले आहेत, त्या यंत्रांस मूळ कलाकौशल्यांची वृध्दि, विलायतेसारिखे ल्हान आणि दूर देशचे लोकांनी येऊन विलायतेपेक्षांही मनुष्यांचे संपत्तीविषयी चांगलें हें राज्य घेतले, आणि रक्षण केले, हे सामर्थ्य त्यांस विद्येनें आलें नव्हे ? बरें असेंच हिंदुस्थानचे लोक पुढे कोणत्ये वेळेस विलायत घेतील. ही कल्पना असंभाव्य स्वप्नासारिखी वाटत्ये याचे कारण काय ? याचे कारण हिंदुस्थानचे लोकांपेक्षां विलायतेचे लोकांत विद्या फार आहे हें नव्हे काय ? विलायत देश या देशापेक्षा, आणि दुसरे बहुत देशांपेक्षा श्रेष्ठता पावला आहे, याचें कारण विद्येचें सामर्थ्य नव्हे काय ? असें असतांही आमचे द्रव्यवान मित्र अशे अबूड दृष्टीचे आहेत की, ते इंद्रियांची हजारो मलिन सुखें ज्ञानाचे स्वार्थापेक्षां चांगली मानितात, ते आपली संपत्ति व जमविलेलें द्रव्य फार वेडेपणाचे खेळांत घालवितात, परंतु विद्येचे कामासाठी एक पैसाही खरचीत नाही. अशा साधारण गोष्टी लिहिल्या असतां, त्यांचे विरूध्द कोठे आढळतें, म्हणून आम्ही कबूल करायास सिध्द आहों की, या स्तुत्य उद्योगांस आपल्या सामर्थ्यांप्रमाणों मदत करणारे आमचे लोकांत बहुत आहेत. या थोड्यांची आम्ही गोष्ट लिहिली नाही,

परंतु आमचे लोकांतून जा बहुत करून लोकांचे डोळे विद्येचे स्वार्थाविषयी आजून झाकले आहेत असे वाटतें, त्यांची लिहिली."(३)

ब्रिटिशांच्या उदार धोरणामुळे हिंदुस्थानात शाळा निघत होत्या. हे चित्र जांभेकरांच्या दृष्टीने उत्साहवर्धक होते. म्हणून शिक्षणाच्या चळवळीला धनीक लोकांनी आर्थिक सहाय्य करावे आणि हे कार्य नेटाने चालू ठेवावे म्हणून 'दर्पण' मधून आवाहनही केलेले आढळते. जग खूप मोठे आहे. इंग्रजी शिक्षण ही त्या जगाकडे पहायची खिडकी आहे. तेव्हा हे इंग्रजी शिक्षण आत्मसात करा असे बाळशास्त्र्यांनी आवर्जून सांगितले. एतद्देशीयांना आपल्या भाषेव्यतिरिक्त, प्रांताव्यतिरिक्त काहीच माहित नसते. दुसऱ्या परिसराचा, देशाचा आणि भाषेचा अभ्यास ते करीत नाहीत. त्या गोष्टी जाणून घेत नाहीत हीच एतद्देशियांची मर्यादा आहे, हे जांभेकरांनी जाणले होते. म्हणून तर "ह्युझोल साहेब मुंबईंत सृष्टिवृत्तांतासंबंधीच्या नव्या गोष्टींचे आकलन करून घेण्यासाठी आणि नवीन वर्तमाने शोधण्यासाठी आला आहे," असे जांभेकरांनी 'दर्पण' मध्ये लिहिले आहे. ह्युझोल साहेबाने देशभर भ्रमंती करण्यासाठी सरकारकडे परवानगी मागितली असून कदाचित सरकार त्याला परवानगी देईल आणि सर्व साहित्य आणि सोयीही उपलब्ध करून देईल. कारण, विक्तर जाकिमांट ह्या फ्रेंच गृहस्थास अशाच कामी सरकारने परवानगी देऊन मदत केली होती. त्यानिमित्ताने एतद्देशियांना अशा विद्याव्यासंगाची जाण करून देण्यासाठी आणि विद्येसाठी प्रयत्नशील बनविण्यासाठी बाळशास्त्री लिहितात, -

'युरोपियन लोक असे विद्या व मनुष्याचें ज्ञान वाढविण्यासाठी आपलीं घरें सोडतात, समुद्रांतून हजारों कोश जातात, परदेशचा जमिनी शोधितात, स्वेच्छेने वियोग सोशितात, व आपण संकटांत पडतात, असे

जेव्हां आमचे दृष्टीस पडतें, तेव्हां ज्ञानासाठीच त्यांस जी ईर्ष्या येते, आणि जा आस्थेनें ते त्याचा उद्योग करितात, तें करून जर अतिशय आश्चर्य झालें नाहीं, तर आम्हास कांहीं समजत नाहीं असें होईल. तसेंच हे लोक इतके तोटे सोसतात, आणि या कामाकरितां केलेल्या मंडळ्या, त्यांचे परोपकारार्थ विद्या वाढविण्याचे उद्योग, आणि नवे नवे शोध, व युक्ति काढून मनुष्याचें सामर्थ्य वाढविण्याचे, किंवा इतर मनुष्यांस उपयोगी पडण्याचे, उद्योग चालतील असें करतात, असे जेव्हा (दृष्टीस) पडतें, तेव्हां युरोपियन लोकां ..... मध्यें सर्वांपेक्षां उत्कृष्टपणा व कळांमध्यें ...... याविषयी संशय राहत नाही.` (४)

एतद्देशीयांच्या अंगी ज्ञानलालसा निर्माण व्हावी आणि विद्येच्या कामी पाश्चात्य लोकांचे अनुकरण त्यांनी करावे हाच बाळशास्त्र्यांचा दृष्टिकोण होता. पाश्चात्य लोकांच्या श्रेष्ठपणाचा गौरव करून, एतद्देशीयांचे मनोधैर्य वाढवून त्यांना कार्यप्रवण करणे याच हेतूने बाळशास्त्र्यांनी `दर्पण` मधून विद्याविषयक लेखन सातत्याने केले आहे.

विज्ञानविषयक दृष्टिकोण.

पाश्चात्य लोकांची जिज्ञासू वृत्ती, संशोधक दृष्टी, धाडस आणि ज्ञान आत्मसात करून घेण्याची तळमळ एतद्देशीयांनी घ्यावी आणि तशा-स्वरूपाचा प्रयत्न करून पाश्चिमात्य देशासारखे हिंदुस्थानाला प्रगतीच्या शिखराकडे न्यावे असे जांभेकरांना वाटत होते. पाश्चात्य राष्ट्रात लागलेले शोध, प्रगत झालेले विज्ञान यांची जाण करून देण्याचा प्रयत्न `दर्पण` कारांनी केला. छापखान्याची माहिती तर त्यांना दिलीच शिवाय त्या-वेळी नुकत्याच सुरू झालेल्या वाफेच्या इंजिनांविषयीची माहितीही स्वतंत्रपणे करून दिली. वाफेपासून मोठमोठी जहाजे चालवण्याइतपत शक्ती

निर्माण होते. शिवाय या शक्तीचा अनेक कामासाठी उपयोग करता येतो. या शक्तीचे ज्ञान एतद्देशीयांना व्हायला हवे. कारण वाफेच्या शक्तीचा ज्यांनी शोध लावला त्या पश्चिमी लोकांच्या बुध्दीत आणि ज्यांना ती उघडून सांगितली तरी समजायला कठीण जाते, त्या पूर्वेकडील लोकांच्या बुध्दीत इतके अंतर आहे. परंतु त्यांनी लक्षात ठेवावे की, ' विद्या कोणते एके देशांतच असते असें नाही, आणि मनुष्य तेथून सर्वत्र सारिखेच. असरेकरून त्यांस कळेल की विलायतेतील लोक हजार वर्षांचे, अलिकडेच आतां जितके एथील लोक कलाकौशल्यांत माहितगार आहेत, त्यापेक्षो कमी होत.'(५) स्वदेशाभिमानाची बाळशास्त्र्यांची वृत्ती यातून प्रगट होते, शिवाय आम्हीही विद्येच्या क्षेत्रात कमी नाही हे ते जाणवून देतात.

आपल्या देशातील पूर्वाभिमान जागृत करून आपल्यात असणारा न्यूनगंड काढून टाकणे बाळशास्त्री जांभेकरांना गरजेचे वाटते. सर्व मनुष्यास बुध्दीचा अंश सारखाच असतो, परंतु आपण प्रयत्न करत नाही. प्रयत्नाने सारे काही सिध्दीस नेता येईल, असे बाळशास्त्र्यांचे मत होते. पाश्चात्य लोक हे प्रयत्नवादी व जिद्दी आहेत. म्हणून ते विद्वान आहेत. आणि आम्ही मात्र मूर्ख. मूर्ख हा शब्दप्रयोग त्यांनी एतद्देशीयांच्या अज्ञानपणास अनुलक्षून केला आहे. ' विद्वान आणि मूर्ख या दोहोंमध्ये अंतर प्रकाश - अंध:कार, सत्य-असत्य, मनुष्याची बुध्दी आणि पशूंचे ज्ञान यांमध्ये जीतकें आहे तितकेंच आहे. मूर्ख आपले आयुष्याचा एकरूप प्रवाहें करून संतुष्ट असतो, तो आपले समोंवतें सृष्टितील पदार्थ असतात ' तितके मात्र पाहातो, त्याची इच्छा संसारातील अवश्य पदार्थांचे बाहेर जात नाहींत, आणि त्यास आपला देश व आपण ज्यांमध्ये राहातो ते लोक यांचे मात्र ज्ञान असतें. इकडे मनुष्याच्यानें जितके श्रम होतात तितके करून विद्वान ईश्वराचे कृत्यांचे गुन्ह्यांचा शोध करायास यत्न करितो, अंतरिक्षांतील

जडांचा, गति वा नियमांप्रमाणें चालतात, ते नियम शोधून काढितो, विचार करून आणि अनुभव घेऊन तो सभोंवतालें सृष्टींतील पदार्थांतील कारणें आणि गुण समजतो, जे समजले म्हणजे तो आपले ज्ञान मनुष्याचें कल्याण करण्याचे उपयोगास लावितो, आणि सृष्टींतील मूळभूतें ही त्या कामात आणितो."(६) `दर्पण` कारांची सूक्ष्म संशोधक दृष्टी येथे दिसून येते. एतद्देशीय लोकांचे जीवनच मुळी व्यवहारी चाकोरीतून चालले आहे. इतर गोष्टींकडे अथवा अफाट विश्वातील गूढांकडे ते लक्ष देत नाहीत. पाश्चात्य लोक मात्र विश्वातील गूढांचे संशोधन करतात आणि त्याचा उपयोग मानवी कल्याणासाठी करतात. आपले दुबळेपणा दूर सारून आपणाही विद्याभिलाषी असून संशोधन क्षेत्राकडे वळले पाहिजे, असे ते म्हणतात. यासाठी शिक्षणाची कास धरणे आवश्यक आहे आणि याकामी सरकारने मदत केली पाहिजे अशीही जांभेकरांची अपेक्षा आहे. ते म्हणतात, "जें सरकार विद्येचे स्तुत्यीस आश्रय देतें आणि प्रजांत उपयोगी ज्ञानाचा प्रसार होण्यास उमेद देतें, तेथे मनास विद्येचा संस्कार करण्यास लोकांस विशेष उत्साह होतो, आणि जुलूमगाराचे अंमलापेक्षां तरी राज्यांत हे उद्योग अधिक सफळ होतात. अशो उद्योगांपासून विद्या सुरूपास येत्ये, आणि लोकांचा ज्ञानसंग्रह वाढतो. एके पिढीचे लोक नवे शोध करितात, त्यांपासून दुसरे शोध पुढली पिढी करित्ये. या रीतीनें विद्या आणि कला वाढतात आणि ज्ञानाचा प्रसार होतो. परंतु आपलीं मनें चांगले मार्गास लावणें, हें जितकें लोकांचे स्वाधीन आहे तितकें राजाचे नाही, हे आमचे लोकांनी ध्यानात धरावें, आणि हें दुसरें लक्ष्यांत ठेवावें कीं, जांस विद्या संपादन करायाची आहे, त्याणीं जर आपले मनांतील द्वेषावृत्ति घालविली नाहीं तर त्यांचा उद्योग फुकट जाईल.

असें होईपर्यन्त युरोपियन लोकांनी कलामध्यें व सृष्टिसंबंधि विद्यांमध्ये जे नवे शोध केले आहेत त्याचें त्यांस चांगलेपणी ज्ञान व्हायाचें

नाही. जरी त्या चांगल्या आहेत अशी थोडासा विचार केला असतां त्यांची खातर होईल, तरी पुष्कळ असे आहेत की ते सर्व नव्या गोष्टींचा तिरस्कार करितात, बहुत लोक चांगले जांचे परिणाम असे फेरफारां-वरही दोष ठेवितात, कारण की ते आळशी असतात, आणि मुळा-पासून आपण व आपले पूर्वी वडील असें करित व मानीत आले आहेत तसें करण्याची त्यांस मोठी आवड असत्ये. जेव्हां अशा कल्पना मनांतून काढून टाकल्या तेव्हां मन सत्यग्रहण करण्यास योग्य होतें. जे सत्य सर्व ज्ञानाचें मूळ आहे असें ज्ञान सर्व शक्तीचें आहे, तेव्हां शोध व विचार यांपासून उपयोगि फळें होतात, वस्तु आपापले वास्तविकपानें दिसतात, त्यांचे गुण समजतात, प्रतिदिवस आणि प्रतिघटका नवे ज्ञान काहीतरी माहीत-गारी करून देत्ये, आणि तीपासून नवी सुखे आणि अत्य आनंद प्राप्त होतात.` (७)

<u>सामाजिक</u>.

`दर्पण` मधून बाळशास्त्री जांभेकरांनी सामाजिक उन्नतीच्या दृष्टीने चौफेर लेखन केले. शिक्षण कार्यापासून ते समाजातील प्रचलित रूढी-परंपरा, दुष्ट चालीरीती, ढोंगी प्रवृत्ती यांसारख्या अनिष्ट प्रथांवर आपली लेखणी चालवली. आपले मागासलेपण आणि पाश्चात्य लोकांचे पुढारलेपण यातील अंतर जाणवून दिले. अंधश्रध्द समाजाला पाश्चात्य ज्ञानाची, विज्ञानाची जाणीव करून देणे, मोठ्या समजुतीवरील विश्वास घातक आहे हे समजावून सांगणे, जगातील बदलत्या परिस्थितीचे भान करून देणे, समाजाची नीतिमत्ता सुधारून त्यांना सुसंस्कारित करून, प्रगती-पथाकडे नेणे, अशाच कामी `दर्पण` ने पुढाकार घेतला. हा समाज-सुधारणेचा पहिलाच प्रयत्न होता. त्यामुळे `दर्पण `च्या मार्गात अनेक अडचणी आल्या. परंतु `दर्पण` कोणाचे मिंधे नव्हते. समाजप्रबोधनाची

कास त्याने अंगिकारली होती. या मार्गात येणाऱ्या सनातन्यांच्यावरच नव्हे तर सरकारवरही त्यानी टीकास्त्र सोडले. प्रसंगी प्रतिगामी वृत्तीच्या लोकांना आणि सरकारलाही सामाऊन घेऊन देशाच्या उन्नतीचे कार्य अवलंबिले.

अंधविश्वासावर हल्ला

हिंदुस्थानात पुणे, मुंबई किंवा सुरत या सारख्या मोठ्या शहरात त्याकाळात `नाचतमाशा सारख्या गुलामगिरी' च्या अनिष्ट प्रथा बोकाळल्या होत्या. खुद्द श्रीमंत लोकच त्यांना आश्रय देत असत आणि त्यापासून आनंद उपभोगत असत. `दर्पण` ने अशा श्रीमंत, हौशी आणि अविचारी लोकांची निंदा करून अशा वाईट चालीविरुध्द आवाज उठविला. " जे लोक कसबिणीच्या मंडळ्या तयार करतात, ते लोक गरीब, दु:खी लोकांच्या लहान मुली विकत घेतात, विधवा स्त्रियांचाही फायदा घेऊन त्यांच्या मुली विकत घेतात आणि शहरात नेऊन विकतात.एवढेच नव्हे, लहान मुलेही चोरून नेतात. मुली जर सुंदर असतील तर त्यांचा अधिक फायदा होतो. अशा स्वरूपाचा निंद्य प्रकार हिंदुस्थानात चालला आहे. त्यामुळे सामान्य माणसाने विचार करावा की ह्या निष्पाप मुलींना ते कोणत्या-उद्योगासाठी प्रवृत्त करतात ? त्यामुळे त्यांच्यावर कोणते संकट उद्भवत असेल ? ह्या अनिष्ट प्रथा धर्मबाह्य आणि विनाशकारक आहेत. यामुळे समाजामध्ये वाईट प्रवृत्ती वाढीस लागतात. परंतु या समाजाची दुसरी रीत आहे. जे लोक तमाशास जातात आणि तमासगिरिणीशी संबंध ठेवतात, त्यांचीच प्रतिष्ठा वाढते. अलीकडे मुसलमान, हिंदू, पारशी लोकांत वाईट प्रवृत्तीकडे आणि व्यसनाकडे पैसा खर्च करण्याची प्रवृत्ती वाढली आहे. पैसा खर्च करायचाच असेल तर संस्कारात, धर्मात खर्च करा. पातकी बायकांची अमद्र कृत्ये धर्मकृत्याशी मिसळणे यापेक्षा मोठा वेडेपणा कोणता ?

आपल्या देशात शिक्षण कमी असल्यामुळे अशाप्रकारच्या निंद्य गोष्टीविषयी समज लहानपणापासूनच घडत गेले. परंतु शिक्षित, समंजस माणसेसुध्दा तमाशास जातात. तेव्हा आम्ही त्यांची किती निंदा करावी ? समाजामध्ये ब-याचवाईट चालीरीती चालू ठेवाव्या हे शहाणपणाचे लक्षण आहे. परंतु त्या चाली विकोपास घालवणे हे मुर्खपणाचे व अज्ञानपणाचे लक्षण आहे. कारण स्त्रियांना अशाकामी प्रवृत्त करणे म्हणजे उघड उघड त्यांना गुलामगिरीत ढकलणे होय.गुलामगिरी ही विनाशकारक असते. सर्वच गुलामगिरीपासून समाजाचे तोटे होतात. अधार्मिक लोकांचे मनोविकार वाढतात. धर्माने वागणारी आणि सज्जन माणसेही अधार्मिक आणि व्यसनी बनतात. नाचतमाशास समाजातील बहुतांश लोक प्रोत्साहन देतात त्यामुळे समाजात नीती फार कमी आहे हेच स्पष्ट होते. नाचणा-या सर्व बायका कसबिणी असतात आणि त्यांची कृत्ये अभद्र असतात. त्यांना आश्रय देणे म्हणजे गुलामगिरीस आश्रय केल्यासारखे आहे.`

बाळशास्त्र्यांनी वरील लेखात समाजातील मुख्य दोषावरील कारणमीमांसा सांगून त्यांवर प्रहार केला आहे. अज्ञानी लोकांबरोबरच शिक्षित वर्गावरही त्यांनी टीकास्त्र सोडले. वाईट कारणाकडे आपली शक्ती वाया जाते त्याच शक्तीचा वापर इतर सामाजिक उन्नतीसाठी केला तर देशाचे कल्याण होईल अशी `दर्पण` कारांची धारणा होती. त्यासाठी ते लिहितात, `आम्ही ही गुलामगिरीची त-हा लिहिली ही कोतवालांचे बंदोबस्ताने बंद होणार नाही. जी वाईट गोष्ट होण्यास ती गुलामगिरी अवश्य पाहिजे, ती गोष्ट पूर्वी बंद झाली पाहिजे, म्हणजे ही गुलामगिरी पक्की बंद होईल, परंतु तिची मुळें अशीं घट्ट झालीं आहेत, की विद्या व मोठे ठिकाणी तसा आचार लोकांस दृष्टिस पडणे, या वांचून ती बंद होईल ही आशा व्यर्थ आहे. म्हणोन आम्ही

याप्रसंगी मले आणि समर्थ इंग्रेज व या देशचे लोक यांस मुख्यत्वे लिहितों कीं, त्यांणी आपले मनुष्यमात्राचे कल्याणाविषयींची इच्छा, मनुष्यपणा, आणि नीति यांही करून ही गुलामगिरीची रीति चालण्याचीं जी साधनें आहेत तीं, आपल्यापासून उपाय होईल तेवढा करून बंद करावीं, जा या गुलामगिरीपासून लोकांची नीति फार भ्रष्ट होत्ये. आणि हजारोंचे घरीं बुड आणि दु:ख ही येतात.' (८)

समाजसुधारणेचे व्रत स्वत:पासून सुरू केले तरच समाजसुधारणा शक्य आहे अशी बाळशास्त्र्यांची धारणा होती. अशा दुष्ट चालीरीतींच्या मुळाशी जाऊन शोध घेण्याची वृत्तीही त्यांच्या ठिकाणी होती. गिरगावात एक कोंबडा माणसासारखे बोलतो आणि भविष्य सांगतो अशी अफवा पसरली होती. त्या आश्चर्यकारक कोंबड्याचा बाळशास्त्र्यांनी शोध घेतला. परंतु एक माणूस स्वत:च्या पोटासाठी इतर माणसांना फसवत होता आणि त्यावर पैसे कमवत होता. बरीच मोठी माणसे यावर विश्वास ठेवत होती. तसेच मुंबईमध्ये एक तुमडीवाला बाला होता. तो काही मनात चिंतन करून आपली तुंबडी रुपयांनी भरतो असे लोकांना वाटत होते. त्याच्या भोंदूगिरीला लोक सरळ सरळ फसत होते. मुंबई प्रांतात त्याकाळात चर्चिली गोष्ट म्हणजे एक मुलगा ईश्वरी सामर्थ्याने चमत्कार करतो. अशा भोंगळ गोष्टीवर जनता विश्वास ठेवते म्हणून जांभेकर म्हणतात, ' परंतु ते जा अज्ञानांत बुडाले आहेत, ते अज्ञान, व जा अज्ञानापासून भोळेपणा उत्पन्न होतो, आणि तशेप्रकारचे लबाड व कावेबाज याचे अनुष्ठानाने चालतात. खरेच पाहिले असतां या देशचे लोकांमध्ये चमत्कारिक व असंभाव्य गोष्टींची नेहमी आवड असणे, हे सर्वदा विचित्र लक्षणच होऊन गेलें आहे. त्यांस सांगा कीं, विलायतेमध्यें घोड्यावांचून वाफयंत्राचे सामर्थ्यानें गाड्या लिवर्पूल शहराहून मान्चेस्तर

शहरास वाटसरू व जिनस घेऊन, दर तासास २० मैल ( १० कोश) प्रमाणे इतक्या जलद जातात, असे सांगीतले म्हणजे ते तुम्हाकडे पाहून आपली डोकीं हलवितील. युरोपियन विद्यांनी केलेला दुसरा कांही चमत्कार त्यांस सांगा, आणि तो युक्तीनें सिध्द करून बुध्दीस आणून देतां येतो असे दाखवा, म्हणजे ते असे समजतील की तुमची शुध्दि गेली, किंवा आपली शुध्दि गेली असे तुम्हास वाटले आहे, आणि असे मनांत आणून ते तुम्हाकडे पाहूं लागतील ` (१)

त्याकाळचा विचार केल्यास जनता अज्ञानाच्या अंध:कारात एवढी बुडाली होती की, ती सहजासहजी बाहेर येणार नव्हती. तरी-सुध्दा `दर्पण` कारांनी अशा समाजाला अंध विश्वासाच्या भोव-यातून काढण्याचा प्रयत्न केला. पाश्चिमात्य देशाची उदाहरणे देऊन तेथील शोध, समाजजीवन, शिक्षण यांचे एतद्देशीयांना आकलन करून दिले. शिक्षणाशिवाय समाजोध्दार नाही हे बाळशास्त्र्यांनी ओळखले होते. ज्ञान, विज्ञानाने माणूस सुसंस्कारित होतो अशी त्यांची कल्पना होती.

`दर्पण` मध्ये बाळशास्त्र्यांनी `काही परभू बानकोटास मोकेकरता आगीची नाव करून गेले` ह्या शीर्षकाखाली लेख लिहिला आहे. आजच्या काळात साधी वाटणारी ही गोष्ट पण त्याकाळात समुद्रपर्यटन करणे म्हणजे धर्म बुडविणे अशी धारणा होऊन असली होती. त्यातही जहाजाने आणि वर सफरीला आणि अशा स्वरूपाचा प्रयत्न ब्राह्मण लोकांकडून व्हावा, ती घटना साहजीकच त्याकाळात आश्चर्य-कारक होऊन असली होती. अर्थात बाळशास्त्र्यांनी त्या लोकांच्या धाडसाचे कौतुक केले आहेच शिवाय देशाटनाचे महत्वही विशद केले आहे. कारण ही छोटीसी घटना उद्याच्या प्रगतीचे आणि देशविकासाचे आश्वासन देणारी गोष्ट आहे असे बाळशास्त्र्यांना वाटले.

## शिक्षण प्रसाराचे कार्य

`दर्पण` ने सर्वात अधिक महत्व दिले ते शिक्षणाला. लोकांच्यामधील न्यूनगंड नाहीसा करून, शिक्षणाचे महत्व पटवुन देऊन, त्यांना शिक्षणाभिमुख करण्याचा महत्वाचा प्रयत्न `दर्पण` ने केला. बाळशास्त्री हे कट्टर पुरोगामी होते. त्यामुळे सनातन्यांना उद्देशून त्यांचे मतपरिवर्तन त्यांनी करावे हे साहजिकच होते. त्या काळात नुकतीच शाळांची निर्मिती होत होती. वाकावर असणे हे महापातक समजले जाई, किंवा आपली मुले इंग्रजी शाळेत गेल्यास ख्रिस्ती बनतील या भीतीमुळे अनेक पालक आपल्या मुलांना शाळेत घालत नव्हते. जे लोक नव्या गोष्टींचा स्वीकार करीत नाहीत, जुने तेच सोने म्हणून हट्ट धरतात, अशा लोकांना नव्या शिक्षणाची महती पटवुन देणे गरजेचे होते. शिक्षण म्हणजे मुळात काय असते हे माहीत नसणाऱ्या अज्ञानी लोकांना समजाऊन सांगणे गरजेचे होते. त्याकाळात केवळ जनताच अडाणी होती असे नव्हे तर विद्वान माणसेही प्रतिगामी आणि अनुदार वृत्तीची होती. सनातनी विचारांचे आणि आचारांचे प्रचंड दडपण समाजावर पडलेले होते. ते दूर करण्याचा प्रयत्न करणे हे सुध्दा त्या काळात महापातक समजले जाई. ते कार्य बाळशास्त्र्यांनी `दर्पण` मधून केले यात वाद नाही.

बाळशास्त्र्यांसमोर सामाजिक विकासाचे व उन्नतीचे व्यापक क्षितीज होते. शिक्षणप्रसाराचे माध्यम म्हणूनच तर त्यांनी नियतकालिक सुरू केले. लौकिक व भौतिक विद्यांचा अंगीकार करणे, विज्ञानाची जाणीव करून देणे, आणि एतद्देशीयांना शिक्षणास प्रवृत्त करणे हाच त्यांचा उद्देश होता. सामाजिक उन्नतीचे आणि व्यक्तित्वाच्या विकासाचे साधन म्हणजे शिक्षण हे त्यांना मनोमन पटले होते. आणि हाच विचार जनतेला पटवून देण्यासाठी त्यांनी वृत्तपत्राचा अंगीकार केला. शिक्षक हा

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

समाजाचा केंद्रबिंदु असतो. तो माणसे घडवु शकतो. जनतेला उपदेश देऊन नीतिमत्ता सुधारत असतो आणि देशाला प्रगतीपथावर नेत असतो. त्यामुळे शिक्षकांनाच चांगल्या शिक्षणाने परिपूर्ण करण्यासाठी जांभेकरांनी `नॉर्मल स्कूल` ची स्थापना केली. बाळशास्त्री जांभेकरांनी शिक्षकांना केलेला उपदेश त्यांच्या शिष्याने केशवराव भवाळकर यांनी आपल्या आत्मचरित्रात कथन केला आहे. त्या उपदेशाचा सारांश असा.

`पूर्वकाळचे महाप्रबुध्द ऋषीजन हे अरण्यवास पत्करून विद्यासंपन्न होत आणि विद्यादान करीत. त्यांनी आपल्या देशात अपूर्व ज्ञानभांडारे भरून ठेवली आहेत. ती इतकी तुडुंब आणि ओतप्रोत भरली आहेत की, ती नुसती चाळायला सबंध जन्म पुरावयाचा नाही. त्या ऋषींचे आपण वंशज म्हणवितो. मग विद्याभ्यास अन विद्यादान करण्याची आपणांस का लाज वाटावी ? विद्या शिकून तुम्हाला कारकून अंमलदार व्हावेसे वाटते. शिक्षकाचा व्यवसाय लोक हलका मानतात. पण तसे नाही. प्रजा मूढ आहे. म्हणून सरकारी नोकरांचे महत्व. विद्याप्रसार जस जसा होत जाईल तसतसे सरकारी नोकरांचे ढोंगसोंग अन् थाटमाट नाहीसा होईल. प्रजा शहाणी आणि समजुतदार झाली म्हणजे कारकुनीला कोण विचारतो ? म्हणून विद्याभिलाषी व्हा. विद्याभ्यास करा. लोकांना सुशिक्षण द्या. सरकार व प्रजा, धनी व चाकर, आईबाप व पुत्र ह्यामध्ये प्रेमभाव निर्माण व्हावा, स्वदेशाभिमान, आणि स्वधर्माभिमान लोकांच्या मनात उपजावा असा प्रयत्न करा. हेच आपले ऋषीवंशजाचे कर्तव्य. गुरू दसपट ज्ञानी असेल तर तो एकपट ज्ञान शिष्यास देऊ शकेल. शंभरपट ज्ञानी असेल तर तो दसपट ज्ञान देईल. म्हणून जास्तीत जास्त विद्यासंपन्न व्हा.` आजच्या शिक्षकांनाहि मुखोद्गत करून ठेवण्यासारखा हा उपदेश आहे. बाळशास्त्री जांभेकर हे जात्याच विद्वान, बहुविध भाषा पारंगत आणि त्यांना ज्ञानाची चौफेर दृष्टी

असल्यामुळे ज्ञानाचे महत्व व सामर्थ्य त्यांना नि:संशय पटले होते. म्हणूनच त्यांनी `दर्पण` च्या खटाटोपातून मागासलेपणाच्या खोल गर्तेत रुतलेल्या समाजाला प्रगतीच्या शिखरावर नेण्याचा प्रयत्न केला. जनतेला विद्येचे महत्व पटवून देऊन त्यांना शिक्षणाकडे प्रवृत्त केले.

हिंदुस्थानात त्याकाळी होत असलेल्या शैक्षणिक चळवळींचा आणि घडामोडींचा तपशील जनतेपर्यन्त पोहोचवण्याचा प्रयत्न `दर्पण` ने केला. त्या काळात आजच्या सारखी वृत्तप्रसाराची माध्यमे प्रगत झालेली नव्हती. सरकारकडून जो हुकूम येई तो आणि इतर शैक्षणिक वृत्तांत `दर्पण` मधून प्रसारित करण्यात येत असे. मुंबईमध्ये मेनवारिंग साहेबाने सुरू केलेल्या इंग्रजी शाळेची बातमी पुढीलप्रमाणे दिली आहे.` मुंबईमध्ये एक इंग्रजी शाळा होणार असून तेथे एतद्देशीय लोकांच्या मुलांना इंग्रजी विद्येचे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या जागेसाठी आवश्यक पात्रता असणारे परिपूर्ण असे शिक्षण देण्यात येणार आहे. तसेच कंपनीने असे ठरविले आहे की, सरकारी सर्व कामे सर्व जातीच्या लोकांना उच्च- नीचपणाचा भेद न मानता द्यावीत. ही गोष्ट हिंदुस्थानातील लोकांना फायद्याची आहे. ह्या जाहीर खबरीकडे लोकांनी अवश्य लक्ष द्यावे.`

दळणवळणाची प्रगती त्यावेळी आजच्या इतकी झाली नसल्यामुळे, लांबच्या प्रांतातून उशीरा येणाऱ्या बातम्या, त्रोटक पण उपयुक्त माहिती `दर्पण` मध्ये दिली जात असे. अशाच स्वरूपाची त्रोटक बातमी पुण्यात सरकारने घातलेल्या इंग्रजी शाळेबद्दलची आहे. पुण्यासारख्या धार्मिक वृत्तीचे लोकजीवन असलेल्या शहरात सरकारने इंग्रजी शिक्षणाला सुरुवात केली. याचे आश्चर्यही व्यक्त करण्यात आले आहे. तसेच ` शिकविणारा मेस्तर इझिलु हा इंग्रजीतील विद्वान आणि मराठी भाषा जाणणारा आहे. म्हणून त्याला शिक्षक नेमले आहे. ते काम चांगले

चालवण्याची त्याची योग्यता आहे असे समजते. परंतु नव्या शाळेत मुले किती, शिकविण्याची पध्दती कोणती, हे समजलेले नाही. परंतु पुण्यात लोक इंग्रजी शिक्षण घेण्यास अनुकूल आहेत आणि या देशातील लोकांत इंग्रजी शिक्षण घेण्याची वृत्ती वाढत चालली आहे हे पाहून आम्हास निःसंशय वाटते की सरकारने इच्छिल्याप्रमाणे घडून येईल.`

इंग्रजी वृत्तपत्रातून छापण्यात आलेल्या काही प्रगतीनिर्देशक बातम्यांना `दर्पण` मध्ये पुन्हा स्थान देण्यात येत असे. `बुकली गाईड` पत्रातून आलेली शिक्षणविषयक बातमी `दर्पण`कारांनी सारांश रूपात दिली आहे.

`पुण्यातील पेशव्यांच्या बुधवार वाड्यात सरकारने इंग्रजी शाळा घातली असून मेस्तर येस्टेल नावाच्या साहेबास महिना ५०० रूपये वेतन देऊन शिक्षक म्हणून त्याची नेमणूक केली आहे. ती शाळा पुढील जानेवारी महिन्यापासून सुरू होईल.`

सरकारचे शिक्षणविषयक धोरण जनतेपर्यन्त पोहोचवण्याचे कार्यही `दर्पण` ने केले. ज्यावेळी सरकारकडून शिक्षण संस्थांना मिळणारा पैसा कमी करण्यात आला त्यावेळी ते वृत्त आकडेवारीसह देऊन त्यावर `दर्पण` ने नापसंती व्यक्त केली आहे. `आज तागायत शिक्षण संस्थांस जो पैसा मिळत होता तो कमी केला आहे. दरवर्षी फक्त २०,००० रू. मिळतील. शिक्षण संस्थांच्या खर्चाची जेव्हा आम्ही चौकशी केली तेव्हा आम्हास समजले की, मंडळीची शाळापुस्तके व मोलस्वर्थ साहेबाचा मराठी कोश छापण्याचा खर्च मिळून चार - पाच वर्षापासून सरकारमधून दरवर्षी ४०,००० अथवा ५०,००० सरासरी खर्च होत असे. येथील लोकांच्या शिक्षणाकरिता खर्च फार होत आहे असे सरकारचे

म्हणणे आहे. त्यामुळे मोठ-मोठ्या शहरातून लोकांच्या कडून निधी उभारून शाळेचा सर्व चालवावा असा त्यांचा बेत आहे. सर्व सरकारी खाती पैशाच्या अडचणीमुळे कमी केली. त्याचकारणामुळे शिक्षणा-वरील सर्व कमी केला. परंतु एतद्देशीय लोक जे शिकण्याची अपेक्षा करतात त्यांना निश्चित वाईट वाटेल.

शिक्षणविषायक चळवळ नुकतीच सुरू होत होती, आणि मध्येच सरकारने त्यामध्ये अडसर निर्माण करून जनतेची प्रगती खुंटणारा मार्ग अवलंबावा हे पाहून बाळशास्त्र्यांनी सरकारच्या कृत्याबद्दल नाराजी व्यक्त केली, शिवाय आपली प्रतिक्रियाही व्यक्त केली आहे. ते म्हणतात, ` जेव्हां राजा किंवा लोक आपल्यास ज्ञानी म्हणवतात, तेव्हां राज्य चालविणाराचा धर्म आहे की, प्रजामध्यें ज्ञान वाढवायाकरितां, आणि त्यांची मने चांगली करायाकरितां त्याणें सर्व प्रकारें आश्रय द्यावा, आणि साह्य व्हावें, असे करण्यानें जे लाभ होतात ते जेव्हां इतके समजण्यात आले, आणि मान्य केले गेले आहेत, कीं मनुष्यास, त्यांची ज्ञानइंद्रियें चालू करण्यानें ज्ञानावस्थेंत आणावे, हे प्रितीचे कृत्य फारच उत्तम आणि उपयोगी आहे, जेव्हां सामान्य मनुष्यें नेटिव लोकांची मनें बरी व्हावीं म्हणोन सर्व यत्न करतात, आणि अशा यत्नाचे चांगले फळाचा दाखला, कलकत्याकडे पाहिले असतां चमत्कारीक आणि अन्यत्र घायास योग्य दिसून येतो, अशा समई, या देशांत जे त्याच कारणास्तव श्रम करतात, त्यांस सरकारने आजदीन पर्यंत जें साहित्य केलें होतें, त्यांतील एक मोठा अंश कमी केल्यानें, त्यांस इतके अश्रयहीण करोंन आणि त्यांचा श्रमाचे फळ प्राप्त व्हायाकरितां जे उपाय होते ते इतके कमी करावे, हा विचार केल्यानें आम्हांस फार दु:ख होतें, यांत संशय नाही.` (१०)

` दर्पण` कारांनी वेळप्रसंगी सरकारच्या चुकाही लक्षात आणून

दिल्या. त्याकाळात हिंदुस्थानी लोकांनी ब्रिटिश सरकारवर टीका करणे किती अवघड होते पण जेथे प्रसंग पडला तेथे मोठ्या मारदस्तपणे आणि प्रतिष्ठित भाषेत सरकारवर टीका करण्यास बाळशास्त्री मुळीच घाबरले नाहीत. मुंबईमधील शिक्षा मंडळीतील युरोपियन मुख्य पंतोजीस त्याचा पगार न देता त्याला सरकारने नोकरीवरून कमी केले त्यावेळी अशाच स्वरूपाची टीका केली आहे. हा पंतोजी एका घरात पाच वर्षे राहिला होता. त्याची प्रकृती बिघडली त्यामुळे त्याने घर सोडण्याचा निश्चय केला. त्यासाठी घरभाडे मिळावे म्हणून त्याने सरकारकडे अर्ज केला. सरकारने त्याचा करारनामा फिरवून नवा करार करण्यास सांगितले, नाहीतर पहिल्या कराराप्रमाणे त्याने नोकरी करण्यास आणाखी मुदत लिहून द्यावी. तरच त्याला घरभाडे मिळेल असे सांगितले. परंतु तो पंतोजी दुसरा करार करण्यास तयार झाला नाही. त्यामुळेच पंतोजीस नोकरीतून काढून टाकण्याचा निर्णय सभेमध्ये घेतला गेला, व त्याचा पगार बंद केला. शिक्षा मंडळीतून हुशार आणि सर्व गोष्टीत निपुण असा पंतोजी निघून गेला व त्याचे झालेले नुकसान पाहून आम्हास वाईट वाटते. अशा गोष्टी अयोग्य आहेत. जांभेकरांनी सरकारचे दोष दिसतील ते स्पष्ट लिहिले आहेत व आपली प्रतिक्रियाही व्यक्त केली आहे. शिक्षण संस्थेतील चांगल्या विद्वान गृहस्थास सरकारने दिलेली वागणूक सहन न झाल्यामुळे त्याबद्दल आपला निषेध जांभेकरांनी व्यक्त केला आहे. कारण जांभेकर सुध्दा एक जातिवंत शिक्षक होते. अशा शिक्षकांच्या-वर याकाळात झालेला अन्याय सहन न झाल्यामुळे त्यांनी लेखणी चालवली.

'एतद्देशियांना उच्चाधिकार हवेत'

इंग्रजी शिक्षणाने एतद्देशीय लोकांच्यामध्ये आत्मविश्वास

निर्माण झाला. इंग्रजी भाषेतच मुळी व्यक्तित्वाचे भान आणून देण्याचा गुण आहे. हे जस जसे वाटू लागले तस तसे पाश्चात्य लोकांप्रमाणे सरकारमध्ये वरिष्ठ जागेवर नोकरी करण्याची इच्छाही बळावत गेली. कारण इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये राजा राममोहन रॉय सारख्या बुध्दिमान हिंदुस्थानी गृहस्थाने न्यायपध्दतीतील दोष काढून त्यावर उपाय सुचविले होते. इंग्लंडच्या विद्वान लोकांनीही त्याच्या बुध्दीची कदर केली होती. त्यामुळे साहजिकच असे वरिष्ठ अधिकाराच्या जागेवर काम करण्याच्या पात्रतेचे लोक हिंदुस्थानात तयार होत आहेत असे एतद्देशीयांना वाटू लागले, आणि इंग्लंडच्या पार्लमेंटलाही ते पटले. त्यामुळे हिंदुस्थानी लोकांना वरिष्ठ अधिकाराच्या जागा याव्यात असा आदेश इंग्लंडच्या पार्लमेंटने काढला. ज्या एतद्देशीय गृहस्थांना ` जस्टिस ऑफ पीस ` सारख्या वरिष्ठ पदावर नेमणूक केली होती त्यांची नावे जाहीर करून त्यांना सनदा वाटून दाखविल्या होत्या. हा सारा वृत्तांत ` दर्पण ` मधून देण्यात आला होता. त्यानिमित्ताने बाळशास्त्री लिहितात, ` इंग्रजांच्या मुलुखातला ज्या या देशातील माणसाचा जन्म आहे त्यांना जस्टीस ऑफ पीसची कामे यावी म्हणून जो पार्लमेंटमध्ये कायदा झालेला आहे ते येथील सरकारकडे आला नाही. कोर्ट ऑफ डायरेक्टर्स यांचा एतद्देशीय लोकांच्या या वरिष्ठ जागेवर नेमणुकी करण्याबाबत फार द्वेष आहे. पण मुंबई सरकारचे मत अनुकूल आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. एतद्देशीयांना उच्च अधिकाराच्या जागा प्रथमत:च मिळवून देण्याच्या कामी लॉर्ड क्लेर व सर हर्बर्ट कांपटन या मुख्य न्यायाधिशांनाच श्रेय यावे लागेल. तसेच पोलीस खात्यातील मॅजिस्ट्रेट तीन आहेत त्या ठिकाणी दोन करावेत आणि पेटी सेशनच्या कोर्टात आजतागायत दोन रोज मो-याचे मॅजिस्ट्रेट व एक बिनपगारी जस्टीस ऑफ पीस व एक वकील असत असत त्याठिकाणी आता एक रोज मो-याचा मॅजिस्ट्रेट,

एक इंग्रज जस्टीस, एक एतद्देशीय जस्टीस ऑफ पीस व शास्त्रासंबंधी विचाराकरिता एक वकील असतील.' अशा स्वरूपाचा सरकारमध्ये कायघात होणारा बदल जनतेला सांगण्याचे महत्वपूर्ण काम 'दर्पण' ने केले आहे. बाळशास्त्र्यांचा यामधून देशाभिमान दिसून येतोच, शिवाय आपण आता प्रगतीकडे नि:संशयपणे वाटचाल करित आहोत याचा आत्मविश्वासही दिसून येतो.

सरकारने पेटी सेशनच्या कोर्टात ज्यावेळी जगन्नाथजी शंकर-शेट यांना मॅजिस्ट्रेट म्हणून नेमले त्यावेळी 'दर्पण' ने लिहिले आहे, 'मॅजिस्ट्रेट म्हणून नेमलेले पाहून आम्हाला आनंद वाटला. अशा वरिष्ठ प्रतिष्ठेच्या जागेवर काम करणारा हा एतद्देशीय प्रथम पुरूष आहे.' असे गौरवोद्गारही काढले आहेत. वरिष्ठ जागेवर सरकार एतद्देशीयांची नेमणूक करू लागले, आणि एतद्देशीय त्यास समर्थ आहेत याचा आनंद व अभिमान बाळशास्त्री येथे प्रकट करतात.

हिंदुस्थानी लोकांच्या सरकारमध्ये वरिष्ठ जागेवर नेमणूका झाल्याने इंग्रज अधिका-यांच्या खुर्चीला खुर्ची लावून बसता येऊ लागले. आपण कुठे तरी कमी आहोत हा न्यूनगंड नाहीसा झाला आणि आत्म-विश्वास वाढीस लागला. परंतु एतद्देशीय अधिकारी वर्गास इंग्रज अधिकारी पत्र लिहिताना अगर बोलताना मान देत नसत. त्यांची नीति उध्दट असे. त्यामुळे सरकारने सर्व कामगारांनी जस्टिस ऑफ पीसच्या जागेवर नेमलेल्या सर्व हिंदुस्थानी लोकांना आदराने बोलावे व वागावे असे फर्मान काढले. कारण, 'या देशातील बहुत करून सर्व लोकांस तसा वहमा आहे, आणखी अशी एक गोष्ट आहे कीं अंमलदार अशा इंग्रज लोकांशी या देशातील ज्या गृहस्थांशी खासगत व्यवहार चालत असे त्यांत इंग्रेज लोक त्यांस 'मैं डीयर सर' म्हणजे माझे प्रीय महाराज' असे लिहीत, व

त्यांस असें दाखवीत कीं तो लिहिणारा त्यांचा परम मित्र आहे, व त्या पत्राचे पाठीवर त्यास `इस्कूयर` किंवा शेट असें लिहीत, परंतु त्याच इंग्रेजांपासून यास सरकारी पत्र येई त्यांत या पत्राचे आरंभी `सर` म्हणजे `महाराज` हा शब्द नसे, किंवा शेवटी सन्मान विशिष्ट शब्द लिहीत नसत, किंवा पत्राचे पाठीवर कांही मर्तबा नसे, इंग्रेज लोक परस्परांस पत्रें पाठवितात त्यांत जर असें नसलें तर त्यास हा उध्दटपणा व अपमान वाटतो, परंतु असें आम्ही लिहीतों कीं, प्रतिष्ठित एतद्देशीय गृहस्थांस लिहीण्याचे जा पध्दतीवरून वाईट वाटतें ती पध्दती कित्येक साहेब लोकांनी फार दिवसांपासून सोडली, आणि ज्यांस ते लिहितात, त्यांचे योग्यतेप्रमाणें त्यांस लिहूं लागलें. ग्याझेटमध्ये जाहीरनामा छापला आहे त्यावरून कळून येईल की, ज्या आमचे थोडे लोकांस जस्तिस आफ पीस नेमिले आहे त्यांस मात्र या आदरयुक्त लिहीण्याचे पध्दतीनें लिहावें.परंतु ही बंदी थोडके दिवस चालेल असें आम्ही इच्छितों, आणि इंग्रेज लोकांस सन्मान करून लिहितात त्याप्रमाणें ज्याची योग्यता आहे त्या गृहस्थांशी सरकार कामगारांशी पत्रोत्तर व्यवहाराचा प्रसंग पडेल तेव्हां त्यांस इंग्रेजांप्रमाणें आदरें करून लिहावें` (११)

बाळशास्त्र्यांचा स्वाभिमान यातून प्रकट होतोच शिवाय स्वबांधवांचा अभिमानही त्यांनी जोपासण्याचा प्रयत्न केला आहे असे दिसून येते.आमच्या भूमीत येऊन आमच्यावर राज्य करणारी माणसे आम्हाला गुलाम म्हणून वागवणार असतील, आम्हाला जर किंमत देणार नसतील तर आम्ही ते कदापीही सहन करणार नाही अशीच जणू त्यांची धारणा होती. जगातील सर्वच माणसे बुध्दीने सारखी असतात. आमचे जे हक्क आहेत ते आम्हाला मिळालेच पाहिजेत. यासाठी त्यानी इंग्रज अधिका-यावर टीकास्त्र सोडले. कांहीवेळा सरकारच्या गुणाचे समर्थनही केले. सरकारदरबारी आब राखून जनहिताच्या गोष्टी प्रामुख्याने `दर्पण`

ने केल्या. ख-या अर्थाने ही एकप्रकारची समाजजागृतीच होती.

## आर्थिक शोषणाविरुध्द आवाज

बाळशास्त्री जांभेकर हे अभ्यासू आणि कर्तव्यदक्ष पत्रकार होते. जगात किंबहुना आपल्या देशात काय चाल्ले आहे याचे ज्ञान मुंबई प्रांतातील लोकांना करुन देणे, सुधारणेच्याकामी जनतेबरोबरच सरकारलाही सामावून घेऊन नव-नवीन सुधारणा करणे, अशा स्वरुपाचे कार्य त्यांनी केले. आज खेडोपाड्यात बँकांची जाळी पसरली आहेत, पण त्याकाळी बँकेचे महत्व पटून आपल्या प्रांतातील लोकांच्या कल्याणासाठी बँकेची अपेक्षा करणारे आणि जाहिरपणे वृत्तपत्रातून सांगणारे बाळशास्त्री एकमेव म्हणावे लागतील. बाळशास्त्र्यांच्या वाचनात मद्रास, कलकत्ता येथील वृत्तपत्रे येत होती. तेथील घडामोडीचे ज्ञान येथील लोकांना 'दर्पण' कार करुन देत असत. 'मद्रासच्या सरकारने जाहिर केले आहे की, कलकत्यातील सरकारने जी पेढी घातली आहे तिच्या सारखी मद्रासमध्ये एक पेढी काढण्यात येणार आहे. ती पेढी उच्चनीचपणाचा भेद न मानता सर्वांना खुली राहील. त्यामध्ये एक रुपयापासून पाचशे रुपयापर्यंत रक्कम ठेवता येईल. वर्षाला शेकडा चार रुपये व्याजही देण्यात येईल. ज्यांनी पैसे ठेवले नसतील त्यांना पाहिजे तेव्हा पाहिजे तेवढी रक्कम काढता येईल. कलकत्याच्या पेढीप्रमाणे मद्रासच्या पेढीत सरकारची भागीदारी असेल. त्या सरकारास अधिकार आहे की सहा महिन्यापूर्वी सुचना करुन व्याजाचा दर कमी करावा. कलकत्यातील पेढी ही गरीब व मध्यम वर्गीयांना सोयीची झाली कारण एरवी खर्च होऊन जाणारी रक्कम पेढीत ठेवली जाते व त्यावर व्याजही मिळते. मद्रास व कलकत्यामध्ये सरकारने चांगल्या विचाराने पेढी घातली त्याप्रमाणे मुंबईच्या सरकारने तशा स्वरुपाची पेढी येथे घालावी. तसे केल्यास लोकांचे कल्याण होईल

व सरकारची प्रतिष्ठा वाढेल.` एकंदरीत ज्या इंग्रजी राजवटीपासून ज्या सुधारणा होत होत्या, त्या सुधारणांचा पुरस्कार करणे, परप्रांतासारखे नवीन उपक्रम आपल्या प्रांतात राबविण्यास प्रोत्साहन देणे अशा स्वरूपाची भूमिका `दर्पण` ची होती.

इंग्रजी राजवटीमुळे व्यापाराला महत्व प्राप्त झाले होते. `दर्पण` कारांना व्यापाराचे हे महत्व मनोमन पटले होते. व्यापारामुळे लोकांचे उद्योग वाढतील. उद्योगामुळे येथील लोकांना काम मिळेल, त्यांच्या उत्पन्नात भर पडून त्यांचे राहणीमान सुधारेल आणि परिणामी देशाची आर्थिक बाजू मजबूत होईल असे त्यांना वाटत होते. परंतु सरकारने व्यापाऱ्यांच्या मालावर ज्यावेळी जकात आकारायला प्रारंभ केला त्यावेळी बाळशास्त्रींनी `दर्पण` मधून आवाज उठविला. माल एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी न्यावयाचा असेल तर सरकार जकात आकारते. त्यामुळे देशातील व्यापारास अडथळा होतो. मालाची झडती घेतल्यामुळे व्यापाऱ्यांचे खूप नुकसान होते. त्यात जकात आकारणारे नोकर व्यापाऱ्यावर खूपच जुलूम करतात. अयोग्य आणि दु:खदायक गोष्टींपासून प्रजेचे रक्षण करणाऱ्या सरकार बद्दल विश्वास वाटत असताना आणि व्यापाराचे महत्व जाणणाऱ्या सरकारने जकाती सारख्या अयोग्य गोष्टीला प्राधान्य द्यावे हे आश्चर्य नव्हे काय ? १२ ते १५ मैलांच्या अंतरावर हे जकात नाके आहेत. प्रत्येक नाक्यावर वेगवेगळा कर आकारला जातो. सरकारकडे जकातीखेरीज उत्पन्नाचे अन्य मार्ग आहेत. त्याचा अवलंब करावा. वेगवेगळ्या मालावर वेगवेगळा कर आकारतातच. शिवाय विलायती मालावर जकात घेत नाहीत. त्यांना खुशाल जाऊ देतात. पण गावठी मालावर मात्र जकात आकारली जाते. शेतकऱ्यांच्या मालावर आणि कारागिरांच्या मालावर जकाती आकारल्याने खूपच वाईट वाटते. सरकारने जकाती घेण्याच्या रद्द केल्या तर लोकांचे उद्योग वाढून उत्पन्नात

मर पडेल आणि साहजिकच व्यापारास आश्रय मिळेल. इंग्लंडमधील अधिका-यांचे मतही असेच आहे. म्हणून तर त्यांनी जकातीचा कायदा तेथे रद्द केला. हिंदुस्थानातील कलकत्याचे गव्हर्नर जनरल बंगाल प्रांतातील जकात रद्द करण्याच्या विचारात आहेत. जकात बंद पडल्याने सरकारच्या उत्पन्नात घट पडेल हे मान्य, परंतु ती घट भरून काढण्यासाठी व्यापार वाढवून, पडीक जमीनी लागवडीखाली आणून आणि उद्योग वाढवून काढता येईल. आम्हास भरवसा वाटतो की, लोकांच्या कल्याणासाठी जकात बंद करण्याचा विचार सरकार करेल.`

सरकारचे दोष दाखवून, अयोग्य गोष्टींना आळा घालून, सरकारला पर्याय सुचवून देण्याच्या कामी `दर्पण` ने महत्वाची भूमिका बजावली आहे. व्यापार वाढवणे, उद्योग वाढवणे, पडीक जमिनी लागवडीखाली आणणे, या गोष्टीतून जनतेचे किंवा देशाचे कल्याण होईल हे बाळशास्त्री ओळखून होते. त्यांचा दूरदर्शीपणाही त्यामधून दिसून येतो. सरकारच्या अनागोंदी कारभारावर टीका करणे आणि लोकहिताच्या कामी झटणे हे वृत्तपत्राचे कार्य असते. ते `दर्पण` ने नि:स्पृहपणे पार पाडले. जकात घेताना नोकरांचा जुलूम, विलायतचा माल जकातरहित या सरकारच्या स्वार्थीपणावर टीका करून तशा स्वरूपाचे कृत्य सरकारने लागलीच थांबवावे असेच त्यांना म्हणायचे आहे.

मुंबई हे इंग्रजी चळवळीचे प्रमुख केंद्र आणि तेथे हिंदुस्थानातील प्रमुख बाजारपेठ असल्याने साहजिकच लोकांची वर्दळ वाढली. वाढत्या लोकसंख्येमुळे भिका-यांचा प्रश्न तेथे निर्माण झाला. जेव्हा भिका-यांचा सुळसुळाट झाला, तेव्हा त्यांच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी आणि त्यांना संरक्षण देऊन ती पध्दत बंद करण्यासाठी टाऊन हॉलमध्ये सभा झाली. त्या सभेचा वृत्तांतही बाळशास्त्र्यांनी `दर्पण` मधून दिला आहे.

तो वृत्तांत असा, ` मुळशी परोपकारी मंडळीने सर्व प्रकारचे गरीब लोक यांचे देश, धर्म किंवा जाति यांचा विचार न करितां संरक्षण करावे असे या समयीं ठरले. वास्तविक कंगाल व वयोवृध्द व जरजर असे जे गरीब लोक त्यांचे ही मंडळी संरक्षण करील, परंतु उद्योग करून किंवा दुसऱ्या कोणत्या उपायाने आपले पोट भरावयास जो समर्थ आहे त्यास ही मंडळी आश्रय करणार नाही. आणखी असे ठरले की, एक धर्मशाळा करावी, आणि जे भीक मागावयाची सोडून देतील त्यास तेथे या मंडळीच्या कायधाप्रमाणे पैका वाटावा, आणि तेथे ज्या गरीब लोकांस नेहमी ठेवून घेतील त्या सर्वांपासून कांही सुलभ कामे करवावी ` या सभेस मुख्य एतद्देशीय लोक हजर होते. भिकाऱ्यांच्या समस्येवर मात करण्यासाठी त्यांना कोणीही भिक्षा देऊ नये, उलट धर्मशाळेत पाठवावे असे ठरले. याकामी सात-आठ हजाराची रक्कम जमली. शेवटी ` दर्पण ` मध्ये म्हटले आहे. ` अशा परोपकारी व धार्मिक कार्यांस इंग्रज व एतद्देशीय लोक जास्तीत जास्त मदत करतील अशी आम्हास आशा आहे. `

अशाच स्वरूपाची मुंबई शहरामध्ये ` शहर साफ ठेवण्याकरिता मंडळीची नेमणूक ` ही बातमी ` दर्पण ` मधून देण्यात आली होती. ` रस्ते स्वच्छ ठेवण्याकरिता रस्त्यातील घाण, केरकचरा काढून टाकावा, म्हणजे शहरातील हवा स्वच्छ राहील व लोकांचे कल्याण होईल. यांकामी एक मंडळ स्थापन केले असून कलेक्टर सारख्या मान्यवर व्यक्तीच्या मार्गदर्शनाखाली ते कार्य करेल. ज्या काही सुधारणा करायच्या असतील त्या या मंडळींला लोकांनी सांगाव्यात. ` सुधारणेच्या बातम्या जनतेपर्यन्त पोहोचवून त्या घटना-कृतींचे अनुकरण करायला लोकांना भाग पाडणे हा ही उद्देश ` दर्पण ` चा होता.

गुन्हेगारीची वृत्ते

ज्यावेळी देशात ठकांचा सुळसुळाट वाढून त्यांच्या निर्दयी कृत्यांना

MR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

ठत वाला त्यावेळी `दर्पण` ने हे वृत्त जनतेपर्यंत पोहोचवले. `ठक लोक निर्दयी, क्रूर असून, त्यांनी शेकडो लोकांना केवळ पैशासाठी ठार केले आहे. रात्री-अपरात्री ते गरिब वाटसरूवर हल्ला करतात, त्यामुळे लोकात घबराटीचे वातावरण पसरले आहे. अशा निर्दयी, निष्ठुर लोकांना कांही ब्राह्मण, सरदार आश्रय देतात. इंग्रज सरकारने त्यांच्या टोळ्या नेस्तनाबूत करून ठकांचा कायमचाच बंदोबस्त केला.` अशाच गुन्हेगारी जगतातील खळबळजनक वृत्त `पट्टावाग आइल आफ फ्रान्समधून पळून गेल्याची बातमी` या शीर्षकाखाली दिलेली होती. मुंबईतील चोरांच्या टोळीचा प्रमुख पट्टावाग सोनार याला जन्मठेपेची शिक्षा होऊन त्याला काळ्यापाण्यावर पाठविले होते. परंतु तो काळ्यापाण्याच्या शिक्षेतून पळून आला. त्याला मुंबईतील कित्येक लोकांनी पाहिलेले होते. म्हणूनच `दर्पण` ने ही बातमी छापली. परंतु त्या बातमीच्या संदर्भात न्याया-धिशांनी `दर्पण` कारांना बोलावून घेऊन विचारपूस केली. ज्यांनी बातमी दिली त्यांची नावे विचारू लागले. ती नावे `दर्पण` कारांनी सांगितली नाहीत कारण ते न्यायाधिश उध्दट रीतीने बोलले. `दर्पण` कारांना अशा रीतीने बोलू लागले की, त्यांनी मिळून बातमी देण्या-ऱ्यांची नावे सांगावीत. पण अशा धमकावणीला ते भ्याले नाहीत. जर त्यांची नावे सांगितली तर त्यांचे खूप हाल होतील आणि पुन्हा आपल्याला अशा बातम्या मिळणार नाहीत म्हणून ते गप्प बसले. नंतर मात्र बातमी देणाऱ्यानेच नावे सांगण्यास हरकत नाही. `ते त्यांना माहित आहे` असे सांगितले तेव्हाच `दर्पण` कारांनी पट्टावाग या गुन्हेगाराला केव्हा व कोठे पाहिले हे `दर्पण` मधून प्रसिध्द केले. `दर्पण` कार या निमित्ताने लिहितात, - `ज्या तडीपार केलेल्या व तिथून पळून आलेल्या गुन्हेगाराला पकडण्यासाठी पोलीस अधिकाऱ्यानी काहीच प्रयत्न केले नाहीत. ज्या माणसांनी या गुन्हेगारास पाहिले त्यांची काहीच छानबीन केली नाही. मुख्य मॅजिस्ट्रेटला तर या गोष्टीवर

विश्वासच बसेना. जेव्हा पट्टावाग याला ठेवले होते त्या मॉरिशसच्या सरकारकडून पट्टावाग व सुमारे बारा कैदी पळून गेले ` अशा स्वरूपाचे पत्र आले तेव्हाच त्यांचा विश्वास बसला. त्यासंबंधी जी आम्ही बातमी प्रसिध्द केली होती ती खरी आहे अशी अधिका-यांची नंतर खात्री झाली. पट्टावाग सारख्या क्रूर गुन्हेगारास पकडण्यासाठी सरकारने तातडतोब प्रयत्न करावेत. वर्तमानपत्राने या अधिका-यास ज्या गोष्टी कळतात त्या अधिका-यांनी इतरांपेक्षा स्वत:च्या डोक्याचा वापर केल्यास अधिक चांगले होईल.`

यावरून `दर्पण` पत्रातील बातम्या किती अचूक होत्या आणि हे पत्र किती जागरूक होते याची कल्पना येईल. वरील वृत्तावरून सरकारी अधिका-यांचा मनमानी कारभार, निष्काळजीपणा आणि `दर्पण` कारांची निष्ठा व पत्रव्यवसायातील बांधीलकी दिसून येते. सरकारी नोकरांच्या, अधिका-यांच्या अकार्यक्षमतेवर ताशेरे ओढविणे, लाचलुचपत, लांडीलबाडी यावर टीकास्त्र सोडणे, अधिका-यांच्यावर बारीक लक्ष ठेवून त्यांच्या अधिकाराचा गैरवापर होऊ न देणे अशा स्वरूपाचे कार्य `दर्पण` कारांनी केले. कोणालाही न भिता जनतेच्या, देशाच्या कल्याणासाठी बाळशास्त्र्यांनी लेखणी झिजविली. देशोन्नतीच्या मार्गात येणारे अडथळे दूर करून सरकारला नवीन कार्याची अंमलबजावणी करण्यास भाग पाडले. `दर्पण` चे हे कार्य प्रशंसनीय म्हणावे लागेल.

धर्मासंबंधी

इंग्रजी राज्याबरोबर इंग्रजी शिक्षण आले. पण याच इंग्रजी शिक्षणाचे बोट धरून इंग्रजांचा धर्म आणि संस्कृतीहि येऊ लागली. ख्रिस्ती मिशन-यांनी सुरू केलेल्या धर्मप्रसारामुळे त्याकाळात धर्मांतराचे मोठे संकट हिंदू समाजावर आले. हिंदू समाजातून कोण बाहेर जाते याची

हिंदु समाजाने आजपर्यंत कधीच पर्वा केलेली नव्हती. तेव्हा बाहेर जाणाऱ्यांना परत कसे आणावे ह्याची चिंता करण्याचे त्याला कधी कारणच पडले नाही. पण धर्माकडे पाहण्याची बाळशास्त्र्यांची दृष्टी फार विशाल आणि संग्राहक होती. इंग्रजी विद्येच्या प्रसाराबरोबर ख्रिस्ती धर्माचा प्रसार होतो आहे हे त्यांच्या लक्षात आले. पाश्चात्यांच्या ज्ञानाचे आणि विज्ञानाचे ते कट्टे पुरस्कर्ते होते. पण त्याचबरोबर त्यांना हिंदु धर्माचा आणि संस्कृतीचा प्रखर अभिमान होता. मात्र धर्माभिमानाला उदार भावनेची जोड मिळायला हवी अशी त्यांची भूमिका होती. त्या काळात धर्माचा अशा गोष्टीने विचार करणे ही काही सामान्य गोष्ट नव्हती. इंग्रजी शिकलेले त्यावेळचे कित्येक विद्वान आणि पंडित शास्त्रीसुध्दा ख्रिस्ती धर्मात गेले. पण सर्वापेक्षा जास्त इंग्रजी विद्या हस्तगत करूनही बाळशास्त्री यांनी आपले स्वत्व आणि स्वाभिमान मुळीच सोडला नाही. आपल्या वृत्तपत्रात धर्मांतराची बातमी ते अगदी कटाक्षाने देत असत.

## धर्मांतराचे संकट

श्रीपाद शेषाद्री ह्याने ख्रिस्ती धर्मात प्रवेश केला त्यावेळी त्याला पुन: हिंदु धर्मात घेण्यासाठी, सनातनी विरूध्द बाळशास्त्री, असे दोन तट पडून हे प्रकरण खूपच चिघळले. बाळशास्त्र्यांवर त्यावेळी बहिष्कारही टाकण्यात आला. शेवटी आपल्यामुळे समाजात फूट पडू नये म्हणून त्यांनी माघार घेतली. `दर्पण` पत्राने अशाच हिंदू लोकांनी ख्रिस्ती धर्मात प्रवेश केल्याच्या बातम्या प्रसिध्द केल्या. अशा लोकांविषयी समाजात खूप उत्सुकता असे आणि तो सर्वांच्या चर्चेचा विषय असे. त्यामुळे धर्मांतर केलेल्या व्यक्तीचे स्वभावविशेष, त्याचे व्यक्तिमत्व आणि त्याची परिस्थिती याचेसुध्दा वर्णन केले जाई. `ख्रिस्ती झालेला

गिरमाजी आपा याचा वृत्तांत ' या शीर्षकाखाली दिलेली बातमी अशाच स्वरूपाची आहे. ' गिरमाजी आपा जोशी याने आपला हिंदु धर्म सोडून ख्रिस्ती धर्म स्विकारला आहे. त्याच्या गृहवर्तणुकीची आणि प्रतिष्ठेची माहिती मिळविण्याचा आम्ही प्रयत्न केला परंतु आम्हास ती मिळाली नाही. या ब्राह्मणाविषयी खूपच बातम्या आमच्या कानावर आल्या आहेत. परंतु त्या विसंगत असल्यामुळे आम्ही त्यावर विश्वास ठेऊ शकत नाही. विश्वास ठेवण्याइतपत एक बातमी, पत्राने आमच्याकडे आलेली आहे. त्यामध्ये गिरमाजी आपा हा जोशीपणा करून भिक्षा मागत असे. आता तो ख्रिस्ती धर्मात जाऊन स्वयंपाक्याचे काम करतो आहे. तो नाशिकमध्ये राहात असून सध्या मुंबईमध्ये मुलोंची शाळा काढून स्वत:चा उदरनिर्वाह चालवतो. त्याने ख्रिस्ती देवळात प्रवेश मिळविण्यासाठी मेस्तर उइल साहेबांन सांगितले. तेव्हापासून त्याच्यात बदल झाला आणि त्याला जो सत्यधर्म वाटतो त्याचे तो आचरण करू लागला. म्हणून त्याने ख्रिस्ती धर्मात प्रवेश केला. '

दुसरी बातमी म्हणजे ' कलकत्यातील बाबू कृष्णा मोहन बानरजी याने हिंदु धर्मातून ख्रिस्ती धर्मात प्रवेश केला. तो हिंदू कॉलेजमध्ये शिकलेला असून ' इनक्वायरर ' वर्तमान पत्राचा चालक आहे. रे.मे. डफ साहेबाने त्यास बापतिज्मा देऊन ख्रिस्ती धर्मात घेतले. या साहेबांनी जी ख्रिस्ती धर्माची पुस्तके लिहिली आहेत ती एतद्देशीय तरूण मुले वाचतात आणि ख्रिस्ती धर्मात प्रवेश करतात. या गृहस्थाच्या बाबतीतही असेच झाले. '

धर्मांतर करणाऱ्या व्यक्तीची कारण मीमांसा ' दर्पण ' कार मुद्दाम देतात. परंतु उपलब्ध अंकावरून ख्रिस्ती धर्मात प्रवेश करू नये असे स्पष्ट कुठेच लिहिलेले आढळत नाही. कदाचित श्रीपाद शेषाद्रीच्या

--प्रकरणावरून जो त्यांना मनस्ताप झाला त्यावरून कदाचित त्यांनी धडा घेतला असेल. परंतु धर्मांतराच्या प्रकरणांना आणि धार्मिक वादांना त्यांनी पत्रात खूपच स्थान दिलेले आहे. हे `दर्पण` मधील वाचकांच्या पत्रव्यवहारावरून सिध्द होते.

बाळशास्त्री हे कट्टर हिंदु धर्माभिमानी होते. ख्रिस्ती धर्माचे संकट पहाता ते जबर होते. आपण जर गप्प बसलो तर सारा धर्मच धोक्यात येईल अशी त्यांची धारणा. बुध्दीच्या कसोटीवर धर्माची तत्वे तपासली पाहिजेत आणि कालबाह्य तत्वे झिडकारून नव्या मूल्यांचा स्वीकार केला पाहिजे किंबहुना परिस्थिती जस जशी बदलत जाते तसे धर्मनिही बदलावे आणि मानवी कल्याणासाठी धर्म असावा असे त्यांचे धर्मविषयक विचार होते. म्हणूनच त्यांनी धार्मिक गोष्टींना `दर्पण` मध्ये स्थान दिले, आणि त्यानी लोकांच्या मनावर जो धर्मांचा जबरदस्त पगडा बसला होता तो थोडा शिथिल करण्याचा प्रयत्न केला.

## धर्मग्रंथ चळवळीला स्थान

धर्माच्या चळवळीत ख्रिस्ती व हिंदु धर्मग्रंथांच्या प्रसिध्दीकरणामुळे खूपच वादंग उठले. एकमेकांच्या धर्मग्रंथातील दोष दाखवून व आपल्या धर्मग्रंथाचे समर्थन करून आपलाच धर्म कसा श्रेष्ठ आहे हे पटवून देण्याच्या कार्याला त्यावेळी ऊत आला होता. वृत्तपत्र अगर छापील पुस्तके या साधनाद्वारे मतप्रदर्शन केले जाई. `दर्पण` कारांनी अशा ग्रंथांची नमुनेदार परीक्षणे छापली आहेत. ग्रंथ प्रसिध्द झाला की तो सूक्ष्मपणे वाचून त्या ग्रंथाचे गुणदोष दाखवणे, प्रसंगी तो वाचकांना विकत घेण्यास अथवा वाचण्यास प्रवृत्त करणे हे कार्य `दर्पण` कारांनी नित्यनियमाने पार पाडले आहे. पाद्री उइलसन् साहेबाने लिहिलेल्या `हिंदुधर्मप्रसिध्दिकरण`

या ग्रंथाचे असेच समर्थन केलेले आहे.` पाद्री ऊइल्सन् यांनी मोरभट दांडेकरांचे हिंदूधर्म स्थापनेचे उत्तर, इंग्रजीत व मराठीत ` हिंदूधर्मप्रसिध्दिकरण ` या नावाने छापले असून ते विकायचे आहे. ऊइल्सन साहेबांच्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत गेले वर्षी त्यांचा व मोरभटाचा जो वाद झाला त्याचा वृत्तांत संक्षेपाने लिहिला आहे. तसेच हिंदुधर्मांची स्थापना मोरभट्टाने कोणत्या रीतीने तयार केली व छापली हेही लिहिले आहे. ब्राह्मणाने हिंदुधर्म स्थापण्याकरिता पुढे येऊन आणि त्यासंबंधी ग्रंथ छापून वादाचा प्रारंभ केला. अशीही गोष्ट प्रथम मोरभटानेच केली असे आम्हास वाटते. ` अशा स्वरूपाचे ग्रंथाचे थोडक्यात परीक्षण करून, ग्रंथाची जाहिरात करून नकळत त्यावर आपले मतप्रदर्शनही केलेले आढळून येते.

तत्कालीन काळात प्रसिध्द झालेल्या ग्रंथांची माहिती, त्यांचे स्वरूप वाचकांपर्यन्त पोहोचवणे, त्याच्या सामर्थ्य मर्यादासहित विश्लेषण करणे हे कार्य ` दर्पण ` ने सातत्याने केले. ` दर्पण ` ने प्रसिध्द केलेला ` प्राचीन धर्म व हिंदुधर्म यांचे स्वरूप व साम्य यांचा शोध ` हा स्फुटलेख ले.क.वानस केनडी यांच्या ग्रंथावर आधारित असून ग्रंथपरीक्षणाचा एक आदर्श नमुना म्हणूनच त्याकडे पहावे लागेल. बाळशास्त्री विद्वान, अभ्यासू आणि जागरूक पत्रकार होते म्हणूनच अशा स्वरूपाचे ग्रंथ काळजीपूर्वक वाचून त्यावरील परीक्षणे ते काटेकोरपणे तयार करीत असत. ` केनडी साहेबांचा हा ग्रंथ अलिकडेच प्रसिध्द झाला असून ते भाषाभिज्ञ व संस्कृत आणि अनेक भाषात निपुण आहेत.त्यांची पक्षपात विरहित दृष्टी, चिकित्सक वृत्ती, यामुळे त्यांनी हिंदुधर्मांचे यथातथ्य वर्णन केले आहे. आम्ही तो ग्रंथ सूक्ष्मपणे आणि मोठ्या आवडीने वाचला असून केनडी साहेबांची सर्वच मते आम्हास मान्य आहेत असे नाही. त्यांनी मन:कल्पीत गोष्टी मांडल्या नाहीत. ते, शास्त्रे

प्राचीन आहेत असे मानतात. परंतु त्याची उत्पत्ती ईश्वरापासून झाली हे त्यांना अमान्य आहे. त्यांना जसा हिंदु धर्म वाटेल, तसे त्यांनी त्याचे वर्णन केले आहे. केनडी साहेब आणि इतर लेखकांनी केलेले सिध्दांत त्यांनी सोडून टाकलेले आहेत. हिंदु धर्माची पुस्तके सातशे आठशे वर्षांच्या आतील नसून ती तीन हजार वर्षांपासूनची आहेत असे त्यांचे म्हणणे आहे व त्यांनी तो शोध लावला. तसेच इतर प्राचीन धर्म व हिंदुधर्म यामध्ये सारखेपणा आहे हे दाखवून दिले आहे. शिवाय संस्कृत व अन्य प्राचीन भाषा यात जवळीकता आहे हे सिध्द केले आहे. त्यावरून प्राचीन धर्म हे हिंदुमतापासून उत्पन्न झाले होते ही गोष्ट पटते. हिंदुशास्त्र्यांचे फल व मानवांच्या मनावर होणारे परिणाम यांविषयी केनडी साहेबांनी संक्षेपाने लिहिले आहे. या ग्रंथातील पुष्कळ मते सत्य व पक्षपात रहित आहेत. हिंदुधर्माचे ज्ञान करून घ्यायचे असेल तर हा ग्रंथ वाचावा. ग्रंथकाराचे पूर्ण ज्ञान, शोधकदृष्टी, परिश्रम आणि सूक्ष्म बुध्दि दिसून येते. तसेच केनडी साहेबांची विद्वत्ता आणि पूर्वदेशीयभाषाभिज्ञ वृत्ती दिसून येते. ग्रंथ चांगल्या योग्यतेचा आहे.`

हिंदु धर्माच्या चळवळीत `दर्पण` वृत्तपत्राने निःसंशय मोठी कामगिरी केली आहे. या चळवळीतूनच हिंदुधर्माचे खरे स्वरूप बाहेर पडले. जिथे दोष असतील तेथे प्रहार आणि जे योग्य असेल त्याचा पुरस्कार ही वृत्ती `दर्पण` ने प्रथमपासूनच जोपासली होती.

<u>सांस्कृतिक.</u>

`दर्पण` कारांनी तत्कालीन सांस्कृतिक घडामोडींना पत्रामध्ये स्थान दिलेले आहे. कोणत्याही देशाची सांस्कृतिक पार्श्वभूमी बळकट असेल तर तो प्रगतीपथाकडे जाऊ शकतो. म्हणूनच त्यांनी सांस्कृतिक बाबींना महत्त्व दिले. त्यातही बाळशास्त्र्यांची जागरूकता आणि

समाजोध्दाराची कळकळ प्रकट होते. नाचतमाशे किंवा कसबिणीच्या कोठ्या हे मनोरंजनाचे साधन जरी असले तरी त्या गोष्टीपासून समाजाला वाईट परिणाम भोगायला लागतात. मनोरंजन करणाऱ्या मंडळींचे आयुष्य दु:खात मरडले जाते. समाजामध्ये अपप्रवृत्ती वाढीस लागतात, आणि समाजाच्या विकासालाच खीळ बसते. त्यामुळे नाचतमाशांना त्यांनी कडक विरोध केलेला दिसून येतो. परंतु कलकत्यामध्ये जेव्हा हिंदु नाटकांचे थिएटर सुरू झाले तेव्हा त्याचे बाळशास्त्र्यांनी स्वागत केलेले दिसून येते. कारण नाटक हे प्राचीन हिंदु संस्कृतीचे आणि सांस्कृतिक चळवळीचे प्रमुख साधन होते. हिंदुस्थानात ज्या नव्या गोष्टींचा प्रसार झाला, त्यात कलकत्यामध्ये हिंदु नाटकशाळा सुरू झाली त्या सांस्कृतिक घटनेचे समर्थन करताना म्हटले आहे, ` डॉ विल्सन् साहेबांनी ` हिंदुनाटक संग्रह ` या ग्रंथात लिहिले आहे. चौदाशे-पंधराशे वर्षांपूर्वी युरोप खंडात नाटकविद्या नव्हती. त्यावेळेस हिंदुस्थानातील नाटके अस्ताला चालली होती. मुसलमानी ग्रंथांत नाटकांचे उल्लेख सापडत नाहीत, त्यामुळे हिंदुस्थानात मुसलमानांनी नाटकाला प्रवृत्त केले असे म्हणताच येत नाही. `

नाटकशाळेच्या निमित्ताने बाळशास्त्र्यांनी नाटकांच्या मुळाचा शोध घेऊन त्यावर दृष्टिक्षेप टाकला आहे. ते लिहितात, ` हिंदूंची नाटके ही या देशात उत्तरेकडच्या व पश्चिमेकडच्या मुसलमान लोकांचा अंमल होण्यापूर्वी केलेली होती. ज्यावेळी हिंदुराजे संस्कृत नाटकांचा रस घेण्यास समर्थ होते त्यावेळी नाटके उदयास आली असावीत. कारण भोजराजा व त्यांचे कित्येक वंशज यांच्या दरबारात जे कवी होते त्यांनी केलेल्या ` शाकुंतल ` इत्यादी नाटकांवरून दिसून येते. पुष्कळ नाटके ही अलिकडील आहेत हे सिध्द करता येते. ` धर्मविजय ` सारख्या नाटकांना तर दोनशे वर्षेही झाली नाहीत. या अलीकडील

नाटकांचा अभिनय कधी झाला असेल असे आम्हास वाटत नाही. ती संस्कृत भाषेत लिहिली आहेत. ती भाषा मुसलमानांच्या राज्यात फार थोड्या लोकांनाच समजत होती. तसेच त्या नाटकात विचित्र भाषांची अनेक संभाषणे आहेत. त्या नाटकातील भाषा कवींना अगर भाषेच्या अभ्यासकांनाच समजते. ही नाटके ज्या राजांच्या नावाने केली आहेत, त्या राजांची माहिती सुध्दा बखरीमध्ये आढळत नाही. कुठल्याही एका राजदरबारात नाटकाद्वारे मनोरंजन करण्याची पध्दत असती तर मुसलमान व युरोपियन बखरकारांनी ती गोष्ट लिहिली असती. यावरून सिध्द होते की, अर्वाचीन नाटके ज्या राजांच्या नावाने केली आहेत आणि त्यांचा प्रथम सभेत अभिनय केला असे प्रस्तावनेत असते, हे सर्व कल्पित आहे. कदाचित प्राचीन व अर्वाचीन नाटके विद्वान लोकांच्या मनोरंजनासाठी इतर काव्यासारखी केली असतील. ते कसे असेल ते असो. एक गोष्ट निर्विवाद आहे, की जरी या नाटकांचा कोठे प्रयोग झाला असला तर ऐकणाऱ्यामध्ये थोडक्यांचेच मनोरंजन झाले असेल. डॉक्टर विल्सनचे मत आहे की नाटकांचा प्रयोग प्राचीन राजांच्या दरबारात होत असे. त्यांनी याविषयी म्हटले आहे ती ऐकणाऱ्यातून बऱ्याच जणांना समजत नसतील आणि त्यापासून सामान्य लोकांच्या मनात रस किंवा अभिरूची निर्माण झाली नसेल.

इतक्या वर्षांनी आता हिंदु नाटकांचा परकीय भाषेत प्रयोग होतो आहे आणि त्यापासून एतद्देशीय आणि इंग्रज लोकांचे मनोरंजन होते हे पाहून आनंद वाटतो. अशा गोष्टी होतील हे कालिदासाच्या आणि भवभूतीच्या कधी मनातही आले नसेल. आमची खात्री आहे की कलकत्यातील हिंदु नाटक शाळेस एतद्देशीय व इंग्रज लोक मदत करतील. `रिफार्मर` वृत्तपत्राच्या संपादकाप्रमाणेच आम्ही इच्छा प्रकट करतो की या नाटकापासून जे मनोरंजन होईल तेणेकरून देशातील अभद्

जत्रा अशा स्वरूपाचे समारंभ बंद होतील.`

नाटकांची कला जगामध्ये प्रथमत:च हिंदूना अवगत होती. यासाठी बाळशास्त्र्यांनी नाटकाच्या उगमाचा शोध घेऊन त्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. समाजातील अनिष्ट प्रथा, रूढी, परंपरा बंद करण्याच्या कामी नाटकासारख्या सांस्कृतिक माध्यमाचा उपयोग होऊ शकेल असा दूरदर्शी विचार बाळशास्त्र्यांचा होता. बारिक सारीक गोष्टीमधून दिसून येणारी `दर्पण` कारांची समाजोध्दाराची दृष्टीही येथे दिसून येते.

आर्थिक विचार

`दर्पण` कारांनी जसे धर्म, शिक्षण आणि समाजोन्नतीच्या कार्याला पत्रात स्थान दिले, तसे आर्थिक विचारालाही प्राधान्य दिलेले आढळून येते. समाजोन्नतीसाठी देशाची आर्थिक बाजू मजबूत असायला हवी. तरच प्रगती शक्य आहे अशी बाळशास्त्र्यांची धारणा होती. यासाठी सरकारने लोकांचे उत्पन्न वाढविण्यासाठी योजना राबवल्या पाहिजेत असाही त्यांनी हट्ट धरला. शेतकऱ्यांच्या पिकासाठी कर्ज देणे, त्यांच्या मालाला योग्य भाव देणे, कारागिरांना उत्तेजन देऊन उत्पन्न वाढविणे, व्यापार वाढविणे, बँकांची निर्मिती करणे अशा स्वरूपाचे अनेक उपाय `दर्पण` मधून सरकारला सुचवून दिले.

शेतकऱ्यांच्या समस्या

बाळशास्त्री हे जागरूक संपादक असल्याने इतर प्रांतात चाललेल्या घडामोडींचे पडसाद आपल्या प्रांतातील लोकांना कळविणे किंवा

प्रसंगी इतर पत्रातील बातम्या आपल्या पत्रात छापणे असा त्यांचा नित्यक्रम असे. कलकत्यातील वृत्तपत्रांमध्ये `गव्हर्नर जनरल साहेबांनी शेतक-यांना वीस हजार रुपयाची मदत करून कापूस, तंबाखू, साखर, रेशीम या सारखी पिके उत्तम काढणा-या शेतक-यांना बक्षिस देण्याचे ठरविले आहे.` अशी बातमी आली होती. हे वृत्त `दर्पण` निर्मिती-नंतरच्या दुस-याच म्हणजे २० जानेवारी १८३२ च्या अंकात देऊन मुंबई इलाख्यातील शेतक-यांच्या उन्नतीसाठी जांभेकरांनी आवाज उठविला. बंगाल प्रांतातील सरकार शेतक-यांच्या प्रगतीसाठी प्रयत्नशील असताना मुंबई प्रांतातील सरकार शेतक-यासाठी काहीच करत नाही. उलट शेतक-यांचे हाल होत आहेत. धान्याची आयात वाढल्याने सर्वच धान्याच्या किंमती उतरत चालल्या आहेत. त्यामुळे शेतकरी वर्ग हवाल-दील झाला आहे. शेतक-यांनी देखील पैसा मिळवून देणारी पिके घ्यायला हवीत. त्यासाठी तो कष्ट करीत नाही. त्यांना जर ती पिके घेण्याची पध्दती शिकविली, त्यांना आर्थिक मदत देऊन मार्गदर्शन केले तर तो कष्ट करू शकेल. अमेरिकेत तंबाखू चांगला पिकतो आणि मॉरिशस येथे कापूस चांगला पिकतो म्हणून सरकारने तेथून कापूस व तंबाखूचे बियाणे आणून शेतकरी वर्गात मोफत वाटण्याचा हुकूम काढला आहे. शिवाय पिके कशी घ्यावीत यांची माहिती देशीभाषेतील पुस्तकात लिहून ती सर्वत्र वाटण्याची तजवीज केली आहे. कापूस साफ करायची यंत्रे पाठवून त्यामध्ये फुकट कापूस स्वच्छ करून दिला जातो. अलीकडे तर साखर व रेशीम उत्पादनासाठी चांगल्या कराराने ज्या जमिनी दिल्या आहेत ते उद्योग सफल झाल्यास बरेच लोक अशा कामा-साठी प्रवृत्त होतील. मातब्बर आणि प्रतिष्ठित गृहस्थास अशा कौलाने मक्ते देणे यापासूनसुध्दा शेतकरी वर्गाचे कल्याण होईल. सरकारने देखील शेतक-यांना वेळोवेळी मदत करावी. म्हणजे उत्पन्न वाढेल आणि

देशाचा वसूल अधिक होऊन जनतेचे कल्याण होईल.

शेतकऱ्यांच्या समस्या, त्यावरील उपाय यासंबंधीही बाळशास्त्र्यांनी विचार मांडले आहेत. हिंदुस्थान हा कृषिप्रधान देश असल्यामुळे शेतीमध्ये प्रगती झाली पाहिजे, शास्त्रशुध्द शेती करून आर्थिक उत्पादन देणाऱ्या पिकांना अग्रक्रम दिला पाहिजे अशा विचारांनीच बाळशास्त्र्यांनी `दर्पण` मधून लिहिले आहे. शिवाय शेतकऱ्यांच्या तंबाखू, कापूस, साखर, रेशीम या पिकावरच औद्योगिक विकास अवलंबून आहे हे त्यांनी जाणले होते.

देशातील आर्थिक विचाराबाबत `दर्पण` कारांचे मत उदार स्वरूपाचे होते. मद्रास, कलकत्ता येथे जशी बँकांची निर्मिती झालेली आहे तशीच सरकारने मुंबई प्रांतात बँकेची सोय उपलब्ध करून लोकांचे कल्याण करावे असे `दर्पण` कार सुचवितात. तसेच खर्च फार होतो म्हणून विलायतेशी आगीच्या जहाजाने व्यवहार करण्यास ज्यावेळी नकार आला आणि गलबत अशा कामासाठी लावू नये अशी कोर्ट ऑफ डायरेक्टर्स यांनी भूमिका घेतली तेव्हा `दर्पण` ने आवाज उठविला. कारण जहाजाचे दळणवळण ठेवले तरच परदेशी व्यापार होईल हे बाळशास्त्री जाणून होते. त्यामुळे पाश्चिमात्य देशाशी सतत संपर्क ठेवण्यासाठी हा मार्ग चालूच केला पाहिजे असे जांभेकरांनी सांगितले.कारण यातच जनतेचा, देशाचा फायदा आहे. त्यामुळे सरकारने नफ्याची गोष्ट सोडून हा व्यवहार पुन्हा सुरू करावा.

बाळशास्त्र्यांनी `दर्पण` मधून सरकारच्या आर्थिक घडामोडींचा तपशील जनतेपर्यंत नेऊन पोहचवला. `कंपनी सरकारच्या तीन इलाख्यातील जमाखर्चाची याद` या शीर्षकाखाली लेख लिहून मुंबई,मद्रास,

कलकत्ता या तीन प्रांतातील १८२७ ते १८३० या तीन वर्षात सरकारने एकूण किती खर्च केला याची माहिती, आकडेवारीसह जनतेसमोर ठेवली आहे. 'तीन वर्षात या खात्यातील खर्च जमेपेक्षा अनुक्रमे १३२८४६७९, ११७४२०८५, आणि १०९६०७०० रुपये इतका अधिक झाला. पेशव्यापासून एवढा मातब्बर मुलूख प्राप्त करून इंग्रजांनी शांतता आणि सुव्यवस्थेचे राज्य आणले. त्यामुळे इंग्रज सरकारांत काही एक रक्कम शिल्लक राहील असे बहुतेकांना वाटत होते. परंतु तोटा झालेला पाहून आश्चर्य वाटते. अधिक खर्च कुठे आणि कसा झाला याचे कारण कळायला साधन नाही. आणि सरकारी वहिवाटीची पूर्णपणे माहितीही नाही. परंतु याकरून वाचकांनी समजावे की सरकारास खर्च कमी करणे भाग पडले म्हणून त्यांनी सर्वच ठिकाणी तसे केले आहे. प्रस्तुतच्या लेखाकरून सरकारच्या राज्यकारभारावर बाळशास्त्र्यांचे बारीक लक्ष होते. आणि अधिक खर्च कसा व कुठे झाला याचा जाबही त्यांनी सरकारला विचारला आहे. पेशव्यांच्या अनागोंदी कारभारामुळे जनता विटली होती. इंग्रजांच्या हाती सत्ता आल्यावर कायदा आणि सुव्यवस्थेचे राज्य आले. त्यामुळे उधळपट्टीवर नियंत्रण असले. काही एक रक्कम शिल्लक रहायला हवी होती, पण तोटा झालेला पाहून, सरकारच्या कारभारावर आश्चर्य व्यक्त केलेले आहे. बाळशास्त्र्यांचा मुत्सद्दीपणा येथे दिसून येतो.

राजकीय विचार

'दर्पण' ने राजकीय घडामोडी जनतेपर्यंत नेऊन जनतेला काही नव्या गोष्टींची जाण करून देण्याचा प्रयत्न केला. इंग्लंडमधील पार्लमेंट आणि जनता यामध्ये झालेला संघर्ष आणि बदल, हिंदुस्थानविषयक पार्लमेंटचे धोरण किंवा ब्रिटिश अधिकाऱ्यांचे विचार, सुधारणाविषयक पास होणारे कायदे, एतद्देशीयांना उच्चपदी नेमणूक करण्यासंबंधीचे प्रयत्न,

अशा चौफेर बाजूंनी `दर्पण` ने लेखन केले आहे. जनतेला नेहमी जागरूक ठेवणे हा त्याचा स्थायीभाव होता. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर जगाच्या घडामोडीमध्ये होणारे बदल विशेषत: इंग्लंडमधील राजकीय परिस्थितीचे आकलन जनतेला करून देण्याचा `दर्पण` चा दृष्टिकोण उल्लेखनीय म्हणावा लागेल. फ्रेंच राज्यक्रांतीने जगाला दिलेली देणगी म्हणजे स्वातंत्र्य,समता, बंधुता ही लोकशाहीची प्रभावी मूल्ये आणि व्यक्तिवादाचा प्रभावी पुरस्कार. या सर्वांचे साद पडसाद `दर्पण` मधून प्रकट झालेले दिसून येतात.

हिंदुस्थानी लोकांना राज्यकारभारामध्ये उच्चपदस्थानी सामावून घेण्यासाठी `दर्पण` ने प्रथमत: विचार मांडले. "राज्यकारभारातील कित्येक खात्यात, विश्वासाचे, आबरूचे आणि जोखिमाचे जागावर एतद्देशीयांना नेमले असता राज्यकारभार योग्य होईल किंवा नाही या गोष्टीचा विचार सरकारने आणि कोर्ट ऑफ डायरेक्टरने पुष्कळ वेळा केला आहे. या देशात प्रामाणिक आणि उद्योगी माणसे असून राज्यकारभाराची वहिवाट त्यांच्या स्वाधीन केल्यास काळजी करण्याचे कारण नाही. उलट आपला स्वार्थच आहे असे कंपनी सरकारच्या नोकरांनी सांगितले आहे. तरीसुध्दा या देशातील लोकांची वरिष्ठ जागेवर नेमणूक झाली नाही. पुष्कळ वर्षे झाली तरी येथील लोकांचा अधिकार सरकारने लक्षात घेतलेला नाही हे पाहून वाईट वाटते. परंतु याचा शोक न करता बंगाल व मुंबई येथील सरकारने नेटिव्ह जज्ज व कमिशनर यांना मोठा अधिकार आणि मोठी प्राप्ती करून देण्याकरिता जे कायदे केले आहेत त्यावरून सरकारच्या ध्येय धोरणात फरक पडत चालला आहे ही आनंदाची गोष्ट आहे. सरकारने जी जबाबदारी आणि विश्वास आमच्या लोकांवर ठेवला ते कार्य त्यांनी उत्तमरीतीने पार पाडावे यातच त्यांचे हित आहे. कित्येकजणांना वाटते की एतद्देशीयाजवळ प्रामाणिकपणा, बुध्दी व

मोठ्या जागेवर काम करण्याची कुवत नाही. परंतु हे अज्ञानपणाचे आणि द्वेषाचे लक्षण आहे. प्राचीन बखरा आणि लोकांची स्थिती पाहिल्यास या देशातील लोकात बुध्दी आणि नीती याचे दाखले पुष्कळ आढळतात. राज्यकारभारामध्ये मोठमोठ्या जागेवर काम करण्यास, बुध्दीमान, प्रामाणिक व बहुश्रुत लोक सापडणार नाहीत असा कित्येकांचा भ्रम आहे तो या दाखल्याकरून खोटा करता येतो.`

बाळशास्त्र्यांच्या `दर्पण` मधील विचाराकरून सरकारला वरिष्ठ जागा एतद्देशीयांना देणे भाग पाडणे आणि एतद्देशीयांचा त्याकामी आत्मविश्वास वाढीस लावणे हे दिसून येते. `आमच्या सरकारचे आम्हावर चांगले लक्ष्य आहे. आम्हास एकवेळ तपासून पहावे, असे त्यांच्या मनात आहे. जर त्यांनी विश्वासाने आणि प्रामाणिकपणे काम केले तर यापेक्षा मोठी संधी प्राप्त होईल आणि त्याचे कल्याण होईल. यामुळे कित्येक लोकांच्या मनात असलेला उदासीनपणा जाईल. ते आपल्या मुलांना अधिक पैसा व श्रम खर्च करून चांगले शिक्षण देतील. अलीकडे विद्येच्या प्रवाहामुळे नवीन तरूण वर्ग तयार होत आहे. त्याची इंग्रजी भाषेतील प्रवीणता, पाश्चात्य विद्यांचे आकलन, आणि त्यांचा बहुश्रुतपणा पाहून निश्चितच त्यांना चांगल्या हुद्यावर काम आणि प्रतिष्ठा मिळेल` तरूणांना आवाहन करून त्यांचा आत्मविश्वास वृध्दिंगत करणे हे बाळशास्त्र्यांनी महत्वाचे मानले. कारण राजकीय बाबतीत ते मुत्सद्दी आणि धूर्त होते. यासाठी तर एल्फिन्स्टन साहेबांनी प्रकट केलेले मनोगत त्यांनी मुद्दाम दिले आहे. `विद्या वाढू लागली म्हणजे राज्यातील मोठ-मोठी कामे या देशातील लोकास द्यावी असे आपोआप होईल. आणि अंतस्थ राज्यसत्ती आणि लढाईतील मोठे अंमल या वाचून इतर सर्व ठिकाणे त्यास सोई पाहून मिळाया जोगी करावी, आणि शेवटी ती सर्व त्यांसच मात्र मिळावी असे करणे राज्यनीतीस योग्य आहे.`

याकरून बाळशास्त्र्यांना आपल्या हक्कांची जाणीव होऊन त्यांना स्वातंत्र्याची कुणकुण लागली होती असे म्हटले तर ते चुकीचे ठरू नये.

`दर्पण` कारांनी सरकारच्या अधिकाऱ्यांची मने वळविण्याचा प्रयत्न केला. एतद्देशीयांना उच्चपदस्थानी नेमल्यास जनतेचा सरकारवर अधिक विश्वास बसेल आणि सरकारला राज्यकारभार करणे सोपे जाईल असे बाळशास्त्र्यांना वाटत होते. राज्यकारभारामध्ये हळू हळू बदल करण्यास सरकारला भाग पाडणे हेच बाळशास्त्र्यांनी महत्वाचे मानले. आणि त्यासाठी एतद्देशीय लोकांची मने खंबीर करण्याचा प्रयत्न त्यांनी `दर्पण` मधून केला.

इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये हिंदुस्थानची न्याय व्यवस्था सुव्यवस्थित करण्याचा महत्वाचा बदल घडून आला. त्याचे वृत्त जांभेकरांनी `दर्पण` मधून दिले आहे. त्याकाळी हिंदुस्थानामधून इंग्लंडला अपीले पाठवावी लागत असत. जे न्यायदानास असतात त्यांना या देशाच्या रीतीरिवाजांची बिलकूल माहिती नसते. त्यामुळेच अपीलांची चौकशी करण्यास वेळ लागतो. त्यामुळे या देशातील अधिकारी लोकावर दहशत रहात नाही. असे होऊ नये म्हणून पार्लमेंटने एक कायदा काढला आहे. त्या कौन्सिलच्या पध्दती चांगल्या व्हाव्या आणि त्यांच्या अधिकारापासून व सत्तेपासून जनतेला फायदा व्हावा म्हणून बरेच कायदे केलेले आहेत. या नव्या नियमाप्रमाणे त्वरीत व योग्य न्यायदान होईल. इंग्लंडच्या सरकारवर लोकांचा जो भरवसा नव्हता तो आता राहील.` अशा स्वरूपाच्या बातम्यामधून सरकारमध्ये जे घडेल त्याची खडानखडा माहिती जनतेसमोर ठेवून जनतेला विश्वासात घेऊन त्यांचा आत्मविश्वास वाढविणे हे `दर्पण` ने महत्वाचे कार्य केले आहे.

इंग्लंडमधील राजकीय घटनांविषयी उत्सुकता

बाळशास्त्री जांभेकरांच्या वाचनात इतर इंग्रजी वृत्तपत्रे येत असत. तसेच काही परदेशी वृत्तपत्रेही त्यांना वाचायला मिळत. पाश्चात्य विद्वानांच्या गाठी भेटी होऊन चर्चा होत असे. शिवाय हिंदुस्थानवर ब्रिटिशांचे राज्य असल्यामुळे इंग्लंडमध्ये घडत असलेल्या घटनांची त्यांना साहजिकच उत्सुकता होती. या उत्सुकतेपोटीच आणि आपल्या देशबांधवांना तेथील समाचार सांगण्याच्या हेतूनेच त्यांनी `दर्पण` मध्ये लिहिले आहे. इंग्लंड देशातील सरकार व जास्तीत जास्त तेथील जनता, राज्यव्यवस्थेत बदल करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे कित्येकांच्या झोपा उडालेल्या आहेत. जर राज्यव्यवस्थेत बदल झाला तर सामान्य लोकांच्या हातात सत्ता येईल. ज्या मोठ्या लोकांच्या हातात सध्या सत्ता आहे ती नाहीशी होईल. म्हणून ते प्रखर विरोध करत आहेत. तेथील राज्यव्यवस्थेत बदल झाल्यास बरे होईल किंवा वाईट होईल यांविषयी आम्ही आमचे मत लिहीत नाही. परंतु एवढे मात्र सांगतो की, गरीब आणि अज्ञानी लोकांपेक्षा श्रीमंत लोकांकडे राज्याची सत्ता असावी. कारण त्या राज्यव्यवस्थेपासून देशाचे कल्याण होते. परंतु कित्येक काळानंतर लोकांच्यामध्ये बदल घडला आणि ती पध्दती देशाच्या प्रगतीस उपयोगी नाही असे वाटू लागले. तसे पाहिले असता इंग्लंडमधील जनतेच्या परिस्थितीत खूपच अंतर पडलेले आहे. म्हणूनच तेथील लोकांनी राज्यव्यवस्था बदलण्याचे ठरविले आहे. त्यांचे कार्य खूपच चांगले. परंतु अवघड आहे. इंग्लंडमधील लोकांची, त्यांच्या राज्यव्यवस्थेची आम्हास पूर्णपणे माहिती नसल्यामुळे आम्ही आमचे मत लिहीत नाही. ` परंतु सांप्रत इंग्लंड व हिंदुस्थान या दोन देशात बहुत संबंध आहे म्हणोन ज्या गोष्टीं पासून तेथे बरे वाईट होईल त्यांपासून एथेंही कांही थोडें बहुत त्याप्रमाणे होईल, म्हणोन लिहिल्या आहेत.` (१२)

बाळशास्त्र्यांनी हा लेख लिहिला आहे तो `दर्पण` पत्र नुकतेच सुरू झाले होते तेव्हा. ज्याप्रमाणे इंग्लंडमध्ये राजकीय घडामोडी घडत होत्या आणि धनिक लोकांची सत्ता जाऊन जनतेचे राज्य येत होते, तशाच स्वरूपाचा बदल हिंदुस्थानात घडून यावा याची जाणीव बाळशास्त्र्यांनी `दर्पण` मधून जनतेला करून दिली आहे. हे स्वातंत्र्याचे वारे बाळशास्त्र्यांच्या मनात प्रथमत:च रुजले होते. केव्हा केव्हा लिखाणातून ते स्पष्ट झालेले आहे. `नव्या राज्यकर्त्यांच्या अंमलाखाली आपण नव्या विद्या प्राप्त करून घेऊन जास्त शहाणे होऊ व नव्या सुधारलेल्या पध्दतीप्रमाणे राज्य कारभार हाकण्याची आपल्यामध्ये पात्रता आल्यावर आपणास पारतंत्र्यांत दडपून ठेवण्यास जगांतील कोणतीही शक्ती समर्थ होणार नाही व इंग्रजी लोकांना शेवटी `चलेजाव `करणे भाग होईल अशी त्यांची खात्री होती.` (१३) ख-या हर्थाने हिंदुस्थानामध्ये `चले जाव` चळवळीचे पहिले पुरस्कर्ते आणि द्रष्टये विचारवंत म्हणून बाळशास्त्र्यांच्याकडेच बोट दाखवावे लागेल. स्वातंत्र्याचे महत्व त्याकाळी त्यांना पटावे आणि त्यासाठी त्यांनी प्रयत्न करावेत हे आश्चर्य नव्हे काय ? त्यांची जागरूकता देशाभिमान आणि राष्ट्रोध्दाराची विशाल दृष्टी पाहून हेवा वाटतो.

अशाच स्वरूपाचा ५ आक्टोबर १९३२ साली प्रसिध्द झालेला त्यांचा लेख - `इंग्लंड देशांतील राजकीय सुधारणेसंबंधीचे बिल संमत झाले` हा होय. त्या लेखात ते लिहितात, `पार्लमेंटच्या सभेत चांगल्या पध्दतीचा बदल घडून यावा यासाठी इंग्लंड देशातील लोक दोन वर्षे भांडत होते. लॉर्ड ग्रे सारख्या गुणी, धाडसी, आणि स्वदेशाचे कल्याण करणा-या व्यक्तीच्या नेतृत्वाखाली तेथील लोक एकत्र आले आणि त्यांनी संघर्ष केला. अयोग्य व्यक्तीजवळ सत्ता असल्याने सर्वांचाच नाश होत होता. तिचा नायनाट करण्यासाठी त्या सर्वांनी दृढ निश्चय केला आणि ते कार्य

सिध्दीस गेले. ते बिल मंजूर होऊ नये म्हणून ड्यूक ऑफ वेलिंग्टन् आणि त्याचे साथीदार प्रयत्न करत होते. परंतु त्यांचा बिमोड झाला. पूर्वी ड्यूक आणि त्याचे साथीदार व स्वार्थी प्रधानांमुळे राज्यव्यवस्थेत जे दोष निर्माण झाले ते दूर करण्याचा प्रयत्न प्रजेच्या पक्षाचे लोक आता करू लागतील. भ्रष्ट सत्ता जाऊन आता तेथे जनतेच्या हाती सत्ता आली आहे.' असे चांगले रीतीने पार्लमेंट सभेपासून इंग्लंड देशात जे कल्याण होईल असे इच्छित आहेत, त्यांतून कांही विभाग या देशासही मिळेल, जेव्हां झरा स्वच्छ होतो, तेव्हां त्यापासून वाहाणारे प्रवाह निर्मळ वाहातात.' (१४)

इंग्लंडमध्ये जनतेने अशी राज्यव्यवस्था उलटून टाकली होती आणि स्वत:चे न्यायाचे राज्य आणले होते तशाच स्वरूपाचा बदल येथेही घडून यावा किंबहुना सरकारनेच जनतेकडे राज्य सुपूर्द करावे असे या लिखाणावरून स्पष्ट होते. हिंदुस्थानात इंग्रजी सत्ता स्थिर स्थावर होते ना होते तोच स्वातंत्र्याचा विशाल दृष्टीकोन बाळशास्त्र्यांनी 'दर्पण' मधून मांडला. आपले राज्य का गेले याचे अचूक निदान करणारा आणि स्वातंत्र्याची प्रथमत:च जाणीव करून देणारा पहिलाच पुरुष म्हणजे बाळशास्त्री जांभेकर.

'या देशावर रशियनांचा हल्ला होण्याचे भय' या मथळ्याखाली मुंबईमध्ये पसरलेल्या एका अफवेचे 'दर्पण' ने निराकरण केले आहे. मुंबईमध्ये रशियनांची टोळी विलायतच्या सरकारवर हल्ला करण्यास येत आहे अशी सर्वत्र चर्चा, तर्कवितर्क चालले होते. कांही विघ्नसंतोषी मंडळी सरकारविषयी असंतोष, अविश्वास निर्माण करीत आहेत आणि येथील लोकांना घाबरवून सोडत आहेत असे लिहिले होते.

व्यक्ति परिचय

`दर्पण` ने मोठ-मोठ्या विद्वान लोकांचा, साहित्यिकांचा परिचय करून देऊन त्यांच्या कार्याचे गुणाविशेष वाचकांना ज्ञात करून दिले आहेत. थोर व विद्वत्तापूर्ण लोकांचे आदर्श जनतेसमोर ठेवणे व जनतेस अशा कार्यास प्रवृत्त करणे हा `दर्पण` कारांचा उद्देश होता. त्यात पाश्चात्य विचारवंत, ग्रंथकार आहेत, तसेच एतद्देशीय विद्वान, कार्यकर्तेही आहेत. राजा राममोहन रॉय सारख्या प्रज्ञावंताचा असाच परिचय आणि त्यांच्या कार्याचे थोडक्यात विश्लेषण `दर्पण` ने केलेले आहे. राममोहन रॉय हा बंगाल देशातला रहाणारा आणि जातीने ब्राह्मण आहे. त्याने लहानपणीच या देशातील व युरोपखंडातील भाषांचा अभ्यास केला. कित्येक विद्वान लोक त्याच्या प्रवीणतेची प्रशंसा करतात. त्याला जशी विद्येची आवड तशीच धर्माच्या विचाराची आवड. त्यामुळे त्याने विचार करून आपला वर्णाश्रमादी धर्म सोडला आणि वेदांतमत स्वीकारले. दिल्लीच्या बादशहामुळे तो विलायतेस गेला. तेथे गेल्यावर राजाचा प्रधान आणि मोठमोठे लोक यांनी त्याचे कौतुक केले. दिल्लीच्या बादशहास वकील चांगला मिळाला असे तेथील लोक म्हणू लागले. विलायतच्या राजाचा भाऊ व मुलगा यांच्याशी त्याची मैत्री जमली. त्यांची मैत्री वाढेल म्हणून कंपनीच्या नोकरांमध्ये भीती निर्माण झाली. कंपनीच्या कामगारांनी ज्यावेळी त्याला मेजवानी दिली त्यावेळी हिंदुस्थानच्या कारभारासंबंधी जमलेले बरेच लोक होते. परंतु त्या ब्राह्मणाने मद्यमांस खाण्या-पिण्यांमध्ये बसून भात व थंड पाण्याव्यतिरिक्त कशालाच स्पर्श केला नाही.` अशा स्वरूपाची बातमी देऊन हिंदुस्थानी लोकांना धर्माभिमान जागृत करायला लावणे आणि थोर पुरुषांचा, त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव करणे हे `दर्पण` ने काटेकोरपणे कार्य केले आहे. त्याच लेखात शेवटी `राममोहन

रॉया सारिखे चात्कारिक पुरुषांविषयींचा गोष्टी पुढल्या एकादे कागदांत आम्ही कदाचीत लिहू ` असे नमूद केले आहे.

हिंदुस्थानात चाललेल्या न्यायदानाच्या पध्दतीची उत्तरे राममोहन रॉय यांनी पार्लमेंटपुढे दिली त्या त्यांच्या कार्याचा आढावा ` दर्पण ` मधून देण्यात आला होता. पार्लमेंटपुढे दिलेल्या उत्तराविषयी राजा राममोहन रॉय यांची खूपच वृत्तपत्रांनी स्तुती केली आहे. आजपर्यंत न्यायदानासंबंधी परखड वक्तव्य कोणी केले नव्हते. त्यामुळे न्यायदानातील दोष काढण्याविषयी, आणि दोष दूर होण्याचे उपाय सांगण्याविषयी राममोहन रॉय यांचे शहाणपण आणि मनाचा मोठेपणा लक्षात येतो. तसेच न्यायदान पध्दतीतील चांगल्या गोष्टींपासून जे कायदे झाले ते कबूलही केले आहेत. या गोष्टीवरून राममोहन रॉय यांचा भलेपणा आणि नि:पक्षपातीपणा दिसून येतो. तसेच कोणत्या पध्दतीने न्यायदानपध्दती चांगली करता येईल आणि त्या पासून लोकांच्या राज्यकारभारात आणि प्रजेत कल्याण कसे होईल हे दाखवून दिले आहे. जी सभा फार मान्यवर, जिच्या जवळ खूप अधिकार आणि तिच्याजवळ बुध्दिवंतातील बुध्दिवान लोक आहेत ती इंग्लंडची पार्लमेंटची सभा हिंदुस्थानमधल्या बंगाल प्रांतात राहणा-या एका गृहस्थापासून सल्ला घेण्यास आणि त्याचे मन अजमावून घेण्यास उत्सुक झाली आहे. आणि त्या पुरुषांच्या देशात जे राज्य करतात त्यांचे सरकार त्याच्या बोलण्यास किंमत देणार नाही अशा स्वरूपाचा राज्यकारभार चालला आहे. या महान हिंदुस्थानात राजा राममोहन रॉय सारखे पुष्कळ लोक आहेत. विलायतेत जसा त्यांचा मानसन्मान केला जातो तसा जर येथे करण्यात आला तर त्याने जसा सल्ला देऊन मत मांडले तसेच तेही सांगतील` हिंदुस्थान सरकारने राजा राममोहन रॉय यांचा योग्य मान राखला नाही याची स्पष्ट शब्दात बाळशास्त्री जाणीव करून देतात.

व्यक्ति परिचय करुन देत असता व्यक्तीचे कार्य आणि महात्म्य-ही `दर्पण` ने कथन केले आहे. प्रस्तुतच्या निवेदनावरुन सरकारवर टीका केलेली दिसून येतेच. शिवाय एतद्देशीय बुध्दिवंताचा वाबर करायला सरकारने शिकले पाहिजे असे नकळत सुचविले आहे.

त्याकाळी समुद्रपर्यटन करणे खूप धाडसाचे कार्य समजले जाई. अशा धाडसाच्या नवनवीन उत्सुकतापूर्ण बातम्यांना `दर्पण` ने स्थान दिले. अशा व्यक्तीच्या गुणांचे आणि कार्यांचे समर्थनही केले.` गुजराथ येथे रहाणारा सामळदास देसाभाई बोडोज शहरावरुन इंग्लंडला गेला होता. तो या देशास परत आला.तो जातीचा अभिमान सोडून व समुद्राची भीती न बाळगता गेला होता. त्याला पहायला आणि इंग्लंड देशातील माहिती त्याच्या तोंडून ऐकायला अनेकजण गेले होते. आमची त्याच्याशी अजून भेट झाली नाही. परंतु त्याला जे भेटले त्यांच्याकडून कळले की, लंडन शहराच्या सौंदर्याचे तो फार गोडवे गातो. तसेच तेथे जे लोक त्याला भेटले ते लोक हिंदुस्थानातील इंग्रजापेक्षा अगदी भिन्न दिसून आलेत. कारण येथील इंग्रजांच्या तोंडचा जो मद्याचा वास येतो, तो तेथील लोकांच्या तोंडचा येत नाही. जेवढ्या लोकांचा त्याच्याशी परिचय झाला ते लोक त्याचा सन्मान करीत, असे तो म्हणतो. हिंदुस्थानात न्याय मिळत नाही म्हणून इंग्लंडच्या सरकारकडे तो गेला होता. तेथील लोकांना जेव्हा हे कळले तेव्हा त्यांनी त्याला मदत केली व ते त्याचे मित्र बनले. जर सामळदासाविषयी किंवा त्याने दावा कसा चालविला हे आम्हास कळले तर ते प्रसिध्द करण्यात येईल. आम्ही ऐकतो की त्याचे हक्क व पैसा त्याला मिळण्यासाठी सरकारने हुकूम काढला आहे.`

अशाच स्वरुपाची समुद्रपर्यटनाची वार्ता `दर्पण`ने काही परभू बानकोटास मौजेकरिता आगीची नांव करुन गेले, त्याविषयी `या

शीर्षकाखाली दिली होती. पर्यटनाचे महत्व सांगून अशा लोकांच्या धाडसाचे गोडवे गाणे व एतद्देशीयांना अशा उपक्रमात सहभागी होण्यास उद्युक्त करणे हा बाळशास्त्र्यांचा दृष्टिकोण होता. एतद्देशीयातून काहींनी अशी बुध्दी दाखवली, तर पाहून आनंद होतो. जहाजाचे महत्व, त्याचा उपयोग, कळून येईल, शिवाय नव्या गोष्टींचे ज्ञान मिळेल. अशा नव्या उपक्रमास जनतेने सहाय्य केले पाहिजे असे बाळशास्त्र्यांनी लिहिले आहे.

मृत्युलेख

मान्यवर व्यक्तींच्या कार्याविषयी त्यांची जनतेला ओळख करून देण्यासाठी `दर्पण` ने तर लिहिले आहेच, शिवाय एखादी प्रतिष्ठित व्यक्ति मृत्यू पावल्यास त्याची बातमी व्यक्तिपरिचय आणि गुणासहित देण्यात येत असे. निधन पावल्याचे दु:खही प्रकट केले जाई. पुण्यातील सरकारी शिल्प शाळेतील मुख्य शास्त्री बाळशास्त्री घगवे यांचा मृत्यू झाल्याची व दु:ख व्यक्त केल्याची बातमी `दर्पण ने प्रसिध्द केली होती.` बाळशास्त्री घगवे हे पटकीसारख्या आजाराने वारले असून पुण्यातील मुख्य हिंदूच्या ते परिचयाचे होते. ते पराकाष्टेचे बुध्दिमान, संस्कृतमध्ये व्युत्पन्न आणि कवी होते. काव्यनाटकाचे ते अभ्यासक असून मराठी कोशाचीही त्यांनी निर्मिती केली. त्यांच्याकडून एतद्देशीयांना खूप अपेक्षा होत्या. परंतु त्यांचे वयाच्या ३६ व्या वर्षी अकाली निधन झाले. आमचे पत्र लिहिणाराने म्हटले आहे की, त्यांचेबरोबर एतद्देशीय लोकांचे विद्याभ्यासाचे एक मुख्य भूषण आणि आश्रय गेला.`

चिमाजीराव आपासाहेब यांच्या मृत्यूचीही बातमी `दर्पण` मध्ये देण्यात आली होती.` आम्ही ऐकतो की चिमाजीराव आप्पासाहेब

बाजीरावाचे कनिष्ठ बंधू वारल्याची बातमी मुंबईंत आली आहे. ते २९ मे रोजी वारले. त्यांचा जन्म इ.स.१७८४ च्या एप्रिल महिन्यात गोदावरी नदीच्या काठी कोपरगावी, मुक्कामी झाला. त्यांचा बाप रघुनाथराव वारला तेव्हा त्यांची आई आनंदीबाई गरोदर होती, आणि पुढे काही महिन्यानंतर चिमाजीराव जन्मले. त्यावेळी नाना फडणवीस यांच्या अधिकाराखाली राज्य चाळले होते. म्हणून चिमाजीराव, त्याची आई आनंदीबाई, भाऊ बाजीराव व त्यांच्या वडीलाचा दत्तकपुत्र अमृतराव ही सर्व सन १७९३ पर्यंत कोपरगावी कैदेत होते. नंतर त्यांस नाशिकजवळ आनंदवेलीस नेले व त्यानंतर त्यांना शिवनेरी किल्यावर बंदीत ठेवले. १७९५ मध्ये माधवराव पेशवे बुन्या-वाड्यावरून उडी घेऊन गेले तेव्हाच नानांनी काम सोडले. ती संधी पाहून बाजीरावाच्या पक्षाच्या लोकांनी त्याला गादीवर बसवले. पुढे लौकरच नवा प्रधान बाळोबातात्या याणे बाजीरावापासून कित्येक मंडळी फोडून शिंदे व परशुराम भाऊ पटवर्धन यांच्या मदतीने बाजी-रावास अधिकारावरून काढले आणि माधवरावांची पत्नी यशोदाबाई हिला चिमाजीआप्पा दत्तक देऊन चिमाजी माधवराव या नावाने गादीवर बसविले. परंतु सर्व संस्थांने व इंग्रज सरकार यांनी बाजीरावाचा अधिकार कबूल करून त्यास पूर्ववत् गादीवर बसविले. चिमाजी आप्पास काढून टाकले आणि भावाचे राज्य घेतले म्हणून त्याकडून प्रायश्चित घेतले. तेव्हापासून त्याने राज्यकारभाराकडे दुर्लक्ष केले. इंग्रजांनी पेशव्यांचे राज्य घेतले त्यावेळेस आप्पासाहेब त्यांचे स्वाधीन झाले आणि त्यांच्या संमतीने काशीस जाऊन विलायती सरकारने वर्षास दोन लाख रुपयांची नेमणूक केली व तो तेथे राहू लागला. चिमाजी आप्पाचे पाठीमागे काहीही संतती नाही."

अशा स्वरूपाच्या वरील मृत्यूलेखातून मराठ्यांचा सारांशरूपाने

इतिहासही बाळशास्त्र्यांनी सांगितला आहे. चिमाजी आप्पा पेशवे घराण्यातील असल्यामुळे त्यांच्या जन्मापासून काही ठळक गोष्टींची माहिती `दर्पण` कारांनी लिहिली आहे. `दर्पण` कारांनी सर्वच घडामोडींना `दर्पण `मध्ये स्थान दिलेले दिसून येते. काही उणीव त्यामधून दिसून येत नाही. मराठी भाषेतील पहिल्याच वृत्तपत्राचे हे कार्य नि:संशय महान आहे.

प्रासंगिक
-------

`दर्पण` मधून बाळशास्त्रींनी काही प्रासंगिक वृत्तांनाही महत्व दिले आहे. मुंबई प्रातांत `दर्पण` चे कार्य अविरत चालू होतेच. शिवाय इतर देश भाषांमध्ये जी वृत्तपत्रे निघत होती त्याची माहिती त्यांनी `दर्पण` मधून दिली आहे. गुजराथी भाषेत निघत असलेले `जामे जमशीद `नावाचे वृत्तपत्र व त्याच्या स्वरूपाविषयी जाहिरात स्वरूपाने लिहिले आहे. `वाचकांसाठी आम्ही कळवितो की, `जामे जमशीद` हे पत्र एका पारशी गृहस्थाने गेल्या महिना पंधरवडयात छापण्यास आरंभ केला आहे. ते दर आठवडयास सोमवारी प्रसिध्द होईल. त्यात विशेषाकरून शहरातील इंग्रजी वृत्तपत्रातील भाषांतरे आणि व्यापारसंबंधी बातमी असेल आणि ते व्यापारी वर्गास बरेच उपयुक्त ठरेल. या पत्राचा बाहेरचा आकार फार चांगला दिसतो आणि अजूनपर्यंत जी गुजराथी भाषेत वृत्तपत्रे झाली, त्यामध्ये ते अति उत्तम आहे. कारण ते पत्र शिलाछापावर छापीत असतात. या देशातील लिपीस ठशांच्या छापापेक्षा शिलाछाप फार चांगला उपयोगी ठरतो.`

वृत्तपत्रांच्या स्वरूपाविषयी माहिती `दर्पण `ने वाचकांना

करून देण्याचा प्रयत्न केला आहे आणि त्याची जाहिरात वजा थोडक्यात माहिती जनतेसमोर मांडली आहे.

`दर्पण` मधील पत्रव्यवहार

वाचकांच्या पत्रांना मराठी वृत्तपत्रात सतत महत्वाचे स्थान मिळत आले आहे. त्याची सुरुवात `दर्पण` या पहिल्या वृत्तपत्रापासून आढळते. `दर्पण` मध्ये वाचकांची पत्रे प्रथमपासून आढळतात. क्वचित संपादकीय उत्तरांसह पत्रे प्रसिध्द होत असत. ज्ञानप्रबोधनासाठी अस्तित्वात आलेल्या `दर्पण` पत्रांत वाचकांना सामान्यत: मोकळेपणाने आपले मनोगत व्यक्त करण्याची संधी देण्यात येत असली तरी, संपादक बाळशास्त्री आपला संयम सुटू न देण्याची दक्षता घेत असत. या पत्रातून प्रकट होणाऱ्या तत्कालीन वाचकांच्या मनाचा, किंबहुना समाजमनाचा तळ शोधता येतो. त्याकाळात धार्मिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक उलाढाली बऱ्याच होत होत्या. त्या सर्वांविषयी समाजाच्या प्रतिक्रिया आणि एकूण सर्व घटनांचे प्रतिबिंब `दर्पण` च्या पत्र - व्यवहारात दिसून येते. शिवाय तत्कालीन समाज किती जागरूक होता याचेही दर्शन त्यामधून दिसून येते.

बाळशास्त्र्यांनी `दर्पण` पत्र अगदी निस्वार्थीपणे चालवले. जनतेला ज्ञान देणे आणि प्रबोधन करणे हाच `दर्पण` चा प्रेरक हेतू होता. त्यामुळे बाळशास्त्र्यांनी फालतू विषयांना अजीबात महत्व दिले नाही. एका गृहस्थाने बाळशास्त्र्यांची स्तुती करणारे पत्र लिहिले ते बाळशास्त्र्यांनी छापले नाही. त्या संबंधी बाळशास्त्री लिहितात.
` त्याने जी आमची स्तुती केली त्यास आम्ही अद्यापी योग्य झालो नाही.

त्या पत्राचा विषय आम्हीच आहोत. परंतु आम्ही चमत्कारीक विषयांना प्राधान्य देत असल्यामुळे ते पत्र आम्ही छापले नाही.`

वरील गोष्टीवरून बाळशास्त्र्यांची प्रसिध्दीविन्मुख वृत्ती दिसून येते. बऱ्हंशी वाचकांनी पाठवलेल्या सर्व पत्रांना `दर्पण` मध्ये स्थान दिले जाई. `क्यू` नावाच्या पत्र लिहिणाराने `दर्पण` कडे पत्र पाठवले होते. परंतु ते `दर्पण` मध्ये छापून आले नाही म्हणून त्याने `कुरियर` वृत्तपत्रात `दर्पण` कारांच्यावर पक्षपाताचा आरोप ठेवून ते छापले. त्याला उत्तर देताना बाळशास्त्री लिहितात, ` क्यू` चे पत्र १४ तारखेच्या अंकात छापले आहे. कदाचित तो अंकच त्यांना मिळाला नसेल. पत्र छापण्यास थोडा उशीर लागला. कारण अगोदर आलेली पत्रे खूपच होती ती छापायची होती. परंतु `क्यू` चे पत्र दाबून ठेवावे अशी आमची इच्छा नव्हती. आम्ही आमच्या विचाराशी सहमत असलेल्या पत्रांना स्थान देतोच. शिवाय सहमत नसलेल्या किंवा आमच्या मताविरुध्द असलेल्या पत्रांनासुध्दा `दर्पण` मध्ये स्थान देत असतो. कोणत्याही बाबतीत आम्ही पक्षपात करीत नाही.` या खुलाशावरून बाळशास्त्र्यांचा नि:पक्षपाती आणि प्रांजळ दृष्टिकोण, `दर्पण` ची उंची वाढवण्यास समर्थ ठरला असे म्हटले तर ते चुकीचे ठरू नये.

`दर्पण` कार वाचकांच्या पत्रव्यवहारात अधिक लक्ष देत. कारण वाचकांच्या प्रतिक्रियातून `दर्पण` कारांना मार्गदर्शन मिळे. असंख्य वाचकांच्या पत्रावरूनच त्यांनी `दर्पण` चे पाक्षिकातून साप्ताहिकात रूपांतर केले. एका पत्र लिहिणाराने अंकातील बऱ्याच चुका `दर्पण` कारांच्या निदर्शनास आणून दिल्या होत्या. त्याला उत्तर देताना बाळशास्त्री लिहितात, ` पुढील अंकापासून पत्रातील ज्या चुका आहेत त्या शुध्दिपत्रात दुरुस्त केल्या जातील. भाषांतरे जर शुध्द नाहीत

असे वाटले तर वाचक आम्हास क्षमा करतील. कारण भाषांतर करण्यासाठी विषय कठीण असतात आणि त्याला खूपच कष्ट पडते. परभाषेतील शब्द, त्यांचे अर्थ बरोबर योजणे, अप्रौढ मराठी शब्द योग्य येणे अशा खूप अडचणी येतात. त्यामुळे जर चुका झाल्याच तर आम्हास क्षमा करावी.`

`दर्पण` पत्र चालवण्यात खूपच अडचणी येत होत्या हे वरील उता-यावरून सिध्द होते. शिवाय दळणवळणाच्या अडचणी, छापखान्याच्या गैरसोयी आणि अपुरे भांडवल हे संकट` दर्पण` वर होतेच. परंतु तरी देखील ह्या अडचणितून `दर्पण` ने मार्ग काढला. एका पत्रात वाचकाने जहाज म्हणजे काय अशी जिज्ञासा प्रकट केली होती. त्याविषयी `दर्पण` ने स्वतंत्र लेख लिहून त्यांच्या शंकेचे निरसन केले, व त्याच्या उत्सुकतेला समाधानकारक उत्तर दिले. तसेच एका पत्र लिहिणाराने `युरोपियन लोकांना असंतुष्ट करण्याच्या भीतीमुळे आपले पत्र छापले नाही` असा आरोप `दर्पण` वर केला होता. त्याला उत्तर देताना बाळशास्त्री म्हणतात ` म.म.स. याने आपल्या पत्रात विपरीत,तुच्छ आणि निंदानालस्ती केली आहे. त्याच्या लिहिण्याच्या कठोर पध्दतीमुळे त्या पत्राला दूषण द्यावे आणि कडवट प्रतिक्रिया व्यक्त करावी असेच ते आहे. परंतु त्या पत्राचा आम्ही मान राखतो, कारण जो खरा धैर्यवान आणि योध्दा आहे, त्याच्याशी वैर करावे, भांडावे अशी आमची इंच्छा आहे. परंतु प्रक्षोभक किंवा भडक पध्दतीचे लेखन करू नये. इंग्रजांच्या देवळात जे लग्नविधी होतात त्या पध्दतीचे दोष जे त्याने लिहिले आहेत, ते जर आम्ही पत्रात छापले तर बहुदा मोठा वाद निर्माण होईल. शिवाय एतद्देशीय वाचकांना ते रूचणार नाही. युरोपियन लोकांना असंतुष्ट करण्याच्या भीतीमुळे त्याचे पत्र छापले नाही किंबहुना

त्याची मते अयोग्य आहेत, त्यामुळे त्याचे पत्र छापले नाही असे नाही. पत्रे लिहिणाऱ्याकरिता आणि आमच्या स्वतःच्या विचाराकरिता जी आम्ही पाने देतो त्यावरून कळून येईल."

"दर्पण" कारांनी प्रक्षोभक आणि काही गोष्टीवर निष्कारण वाद होऊ नयेत अशी पत्रे छापण्याचे टाळले आहे. कारण इतर पत्रामध्ये धर्मासंबंधी जे वाद चाललेले होते त्यावेळी "दर्पण" ने आपली भूमिका "दर्पण चालविण्याची आमची रीति" .या मथळ्याखाली स्पष्ट केलेली आहे. "आमची खातर आहे की एथे सांप्रत लोकांची स्थिती आहे त्या स्थितीत आम्ही आजपर्यन्त चालविलेल्ये रीतिने चाललो असतांच लोकांस फार उपयोग आणि ज्ञान होईल. ती रीति ही की लोकांस माहितगारी व्हावी, ज्ञान वाढावे आणि ज्ञान वाढल्याने लोकामध्ये शोध करण्याची जी इच्छा होईल ती ही संभाळावी, आणि इतके करून लोकांचे मनोरंजन व्हावे." १५

आपल्या भूमिकेला धक्का न लावता ज्ञानदानाचे आणि प्रबोधनाचे व्रत "दर्पण" ने अखंडपणे कार्यान्वित केले. पत्रव्यवहारामध्ये सर्वांगीण विषयाला प्राधान्य दिले. शक्यतो सर्व पत्रे प्रकाशित करण्याचा प्रयत्न केला. काही पत्रांना कमी करून त्यांनी टाळले. बहुतांशी धार्मिक आणि सामाजिक स्वरूपाची पत्रेच "दर्पण" मध्ये अधिक दिसून येतात. त्या वाचकांच्या "दर्पण" मधील पत्रव्यवहाराचा स्थूलमानाने आपण विचार करू.

धार्मिक

धार्मिक पत्रांना ".दर्पण" ने विशेष महत्व दिलेले दिसून येते.

ख्रिस्ती मिशनरी आणि एतद्देशीय लोक यांच्यात जो धार्मिक वाद उत्पन्न झाला त्याची कल्पना या पत्राकरून येते. ख्रिस्ती आणि हिंदू यांनी एकमेकांच्या धर्मावर ताशेरे उडविणे, आपलाच धर्म कसा श्रेष्ठ आहे हे पटवून देणे अशा स्वरूपाचे प्रकार तत्कालीन लोकात निर्माण झाले होते. यातूनच सनातनी विरुध्द सुधारक असे गट पडले. एकमेकांचे मत-प्रदर्शन या पत्रात आढळून येते. शिवाय या पत्रव्यवहारामध्ये हिंदूधर्माचे समर्थन करणाऱ्या पत्रांनाच अग्रस्थान दिलेले आहे. तत्कालीन धार्मिक संघर्षाचे स्वरूप कसे होते ते, एका वाचकाने `दर्पण` ला पाठविलेल्या आणि `दर्पण` ने २९ जून १८३२ रोजी छापलेल्या पत्रातून सहज लक्षात येते.

`मी तुमचा पत्र वाचणारा लिहितों एसें जे तुम्ही पत्राचें नाव `दर्पण` असें ठेविलें आहे, परंतु या तुमच्या पत्राचें नाव `रणशिंग` असे ठेविलें असतां फार चांगलें शोभेल, कांकीं ते शिंग वाजलें म्हणजे दोहों सैन्यांत जसी लढाई होऊं लागत्ये, तसें तुमचें पत्र होतांच वाद चालू झाले. असो ही थट्टा. परंतु सांप्रत तुमचे पत्रांत धर्माचे वादांची पराकाष्टा झाली. ती इतकी कीं, वाचणारांतून बहुतांचे चित्तांत त्याचा त्रास उत्पन्न झाला असेल असें मला खचित वाटतें.

तुम्हास जर पत्राची जागा भरायास दुसरा विषाय सांपडत नसला तर तुम्ही ते वाद इतके छापितां हें ठीकच आहे, तसें जर नसलें तर तुम्हीं ते इतके कोणत्या नफ्यानें छापितां, हें समजायास मी इच्छितों. मता भीमान्यांची समाधानें व्हावीं हें जर तुमचे लक्ष्य असलें तर तें परम अशक्य आहे. ती गोष्ट कशी होईल ? कांकीं त्यांचें नावच मताभीमानी, तेव्हां ते अभिमान कसा सोडतील ? आणि अभिमानानें लोक काय बोलतील याचा विश्वास नाहीं .... माझा अभिप्राय हा किं काहीं. वाद छापावें,

परंतु पत्रांची पत्रे जीं वादानें भरतां, त्यांत दुसरे उपयोगी व मनोरंजक विषय लिहायास बहुत मिळतील ` (१६)

प्रस्तुतच्या पत्रकर्त्याने ` दर्पण ` पत्राचे दोष सांगितले आहेतच. शिवाय टीकाही केली आहे. तरीसुध्दा बाळशास्त्र्यांनी ह्या पत्राला ` दर्पण ` मध्ये प्रसिध्दि दिली. बाळशास्त्र्यांचा विशाल दृष्टिकोण आणि नि:पक्षपातीपणा दिसून येतो.

१३ एप्रिल, १८३२ च्या पत्रात एका पत्रकर्त्याने शास्त्रे व परलोकसिध्दि या विषयावर चर्चा केली आहे. कारण १७ फेब्रुवारीच्या अंकात ` सत्यशोधक ` या पत्रकर्त्याने ` विद्वान लोकही बहुदा इहलोकी कामे करण्यास अनुपयोगी आणि परलोक साधन म्हणावे तर तशी पुण्यकारक नव्हेत अशा शास्त्रांच्या अभ्यासात स्वत:ची आयुष्ये खर्ची घालतात. शास्त्राच्या उपयोगी असणारे मुळग्रंथ एकीकडेच राहिले आणि वादग्रस्त ग्रंथाकडेच सर्वांनी लक्ष द्यावे अशी पध्दत पडली आहे ` असे लिहिले होते. म्हणून त्याला उत्तर देण्यासाठी वाचकाने हे पत्र पाठवले आहे. त्याच्या स्पष्टीकरणार्थ तो लिहितो, ` त्यास हिंदुंची शास्त्रे इहलोकोपयोगी थोडीच आहेत व परलोकोपयोगीच बहुदा आहेत असे वाटते. परलोकोपयोग ज्या शास्त्रापासून नाही असे शास्त्रच नाही. आणि ती विद्वान लोक वाचतसुध्दा नाहीत. शास्त्रे ही इहलोकोपयोगी नाहीत हा दोष नव्हे. इहलोकाचा निर्वाह लोकांच्या चाली पाहून होतच आहे, व इहलोकोपयोग तुच्छ आहे म्हणून बहुदा शास्त्रे परलोकार्थच आहेत. शास्त्राच्या मुळग्रंथातील अर्थ खोलवर समजून घ्यायचा असेल तर तो सूक्ष्मपणे वाचला पाहिजे, तरच तो समजतो. असे असता शास्त्राचे मूळ ग्रंथ एकीकडेच राहिले असे लिहिणे चांगले नाही. व्याख्याग्रंथ व मोठे ग्रंथ

केवळ वादाच्याच उपयोगी आहेत असे लिहिले आहे ते त्यांना न समजल्या-मुळेच. कारण संस्कृत भाषेतील ग्रंथातच परलोकसिध्दि आहे. शास्त्रात गोष्टी व कांही जे पदार्थ असतील त्यांचे स्मरण चिंतन कसेहि करावे त्यापासून परलोकसिध्दि आहेच असे ब-याच ग्रंथावरून स्पष्ट झालेले आहे. त्या विषयाचा अभ्यास विशेष घासाघीस करून होतो तो विषय चित्तात दृढ होतो आणि बुध्दिमध्ये चांगला बिंबतो. याकरता शास्त्रांच्या मुळग्रंथावरील व्याख्या काटेकोरपणे पाहिल्यास आणि सुक्ष्मतिसुक्ष्म गुण शोधून काढले म्हणजे शास्त्राचे विषय बुध्दित दृढ झाल्याने परलोक-सिध्दि आहे हे स्पष्ट होते.' यावरून सत्यशोधक यांच्या पुरोगामी विचाराला एका सनातनी वाचकाने प्रतिगामी विचाराचे केलेले समर्थन अगदी मार्मिक आहे.

'दर्पण' मध्ये काही जातीविषयक पत्रे प्रसिध्द झालेली दिसून येतात. जाती परमेश्वराने निर्माण केल्या की मानवाने अशा स्वरूपाचा सूर त्या पत्रातून दिसून येतो. तर ४ मे, १८३२ च्या पत्रात हिंदुधर्माचे जोरदार समर्थन करणारे आणि ख्रिस्ती धर्मावर टीकास्त्र सोडणारे विचार प्रकट केलेले आहेत. तो म्हणतो,' हिंदु धर्माची निंदा करणारी पुस्तके अलीकडे बरिच लिहिली आहेत. ती निश्चित पक्षपाताने लिहिली आहेत. हिंदू लोक श्रेष्ठ आहेत हे कितीतरी ग्रंथावरून सिध्द झाले आहे. हिंदू धर्माची निंदा केल्याने ख्रिस्ती धर्म श्रेष्ठ ठरतो असे नाही. अशी पुस्तके तरूणांच्या हातात पडल्यास विपरीत परिणाम होतो.' प्रस्तुतचे पत्र पुण्याच्या गृहस्थाने पाठविलेले असून पुण्यासारख्या सनातनी मंडळीचे विचार कसे होते याचे प्रत्यंतर यामधून दिसून येते.

वरील हिंदुधर्माच्या कट्टर पुरस्कर्त्याच्या पत्राला उत्तर म्हणून 'हिंदुंचा मित्र' याने हिंदुधर्माची दुसरी बाजू सांगून धर्माची खरी मूल्ये

काय असावीत याचे सुधारकाच्या दृष्टिकोणातून स्पष्ट आणि रोख-ठोक विवेचन केले आहे. त्याच्या पत्राचे सार असे आहे, ` हिंदुंच्या ग्रंथात काही चांगल्या गोष्टी असतील परंतु जर एखादी वाईट गोष्ट असेल आणि ती परमेश्वरापासून निर्माण झाली या मताशी आम्ही सहमत नाही. असा लबाड माणूस एखाधा चोरीवरून ओळखला जातो तद्वत धर्मातील एखाधा वाईट गोष्टीवरून धर्म परमेश्वरापासून निर्माण झाला नाही हे सिध्द होते. सत्य किंवा काल्पनीक गोष्टींना हिंदुंच्या शास्त्रात कोणताच आधार सापडत नाही. त्यावरून ती शास्त्र परमेश्वराने निर्माण केली नाहीत हेच सिध्द होते. जर हिंदु लोक ख्रिस्ती धर्माचा सुक्ष्मपणे अभ्यास करतील तर धर्माची खरी मुल्ये कळतील. बरेच लोक इतर धर्माचा अभ्यास करत आहेत. सरकारने देखील आपल्या धर्माप्रमाणे वागण्यास मोकळीक दिलेली आहे. टीकाकारांच्याविषयी वाईट मत करून घेण्याचे कारण नाही. कारण हिंदु, ख्रिस्ती आणि मुसलमान धर्मातही ते वाईट दोष दाखवतात. त्यामुळे टीकाकारांचा निर्दयपणा प्रेमाचा असतो. मानवजातील काही तरी देण्याच्या दृष्टीनेच तो आचरण करत असतो ` या पत्रातून दिसून येणारा उच्च विचार, प्रांजळपणा, सडेतोड वृती, धर्मातील वाईट गोष्टी काढून टाकल्या पाहिजेत आणि अखंड मानवजातीच्या कल्याणासाठी धर्म असला पाहिजे, अशा स्वरूपाचा सूर खरोखरच उल्लेखनीय आहे. या गोष्टीमुळे सुधारकांच्या तत्कालीन मतांचा निश्चित उलगडा होतो.

१६ जून, १८३२ च्या अंकात ` मनुष्याचा मीत्र` नावाने पत्र लिहिणाऱ्या गृहस्थाने धर्माचे मुख्य तात्पर्य सांगण्याचा प्रयत्न केला आहे. कारण ह.न.र. याने पाठविलेल्या पत्रात ` धर्माचे फळ म्हणजे माणसाच्या मनात परमेश्वरावर श्रध्दा असावी, आपण पापी

आहोत याची खात्री पटावी, आणि सर्वभूती दया व कृपाळूता इत्यादी नीति आचरणात यावी" असे लिहिले होते. प्रस्तुत पत्रकर्ता म्हणतो," इ.न.र. याने सांगितलेली हीच ख-या धर्माची फळे आहेत. आणि त्याच्या मताशी आम्ही सहमत आहोत.

मुसलमान लोकांचे प्रेम परमेश्वरावर असत नाही. कुराण परमेश्वराकडे दया, माया आहे असे वर्णन करीत नाही. परमेश्वर काहीतरी काम सांगतो आणि त्याबद्दली काहीतरी देण्याचे कबूल करतो. म्हणून मुसलमान लोक असे मानतात की, परमेश्वराशी मानवाचे कोणत्याही पध्दतीचे संबंध नाहीत. ते आपण पापी आहोत असे मानतच नाहीत. कारण कुराण त्यास शिकविते की, त्याचे पातक इतके थोडे आहे की त्याच्या श्रमाने ते नाहीसे होईल. कुराणापासून " सर्व भूती दया कृपा" निर्माण होत नाही. त्याच्या मनात आपणाहून सर्व माणसे कु-यासारखी आहेत. तसेच जे लोक मुसलमान होत नाहीत त्यांना ठार करावे अशी कृत्ये करण्यास कुराण भाग पाडते. शिवाय तू पुण्य आणि फळ दे, स्तुती कर दान दे, उपास कर आणि क्षमा, स्वर्ग, दारू आणि स्त्रिया घे असे सांगते. यावरून ख-या धर्माची मुख्य महमद पैगंबराच्या मुस्लीम धर्मात नाहीत हे स्पष्ट होते.

हिंदु धर्मात कृपेचा मार्ग मुसलमानांच्या धर्मात आहे त्यापेक्षा काही अधिक नाही. हिंदू दुसरे काही मानीत नाही. आपला व्यवहार परमेश्वर बरोबर न्यायाने करतो असे मानतात. त्यामुळे प्रेम करण्याची गोष्ट राहिलीच नाही. त्याच्या मनात परमेश्वराचे प्रेम उत्पन्न करणारे काही नाही. हिंदू आपण पापी आहे असे मानत नाही. कारण, किर्तन, प्रायश्चीत, उपवास, धर्म व स्नान करून त्याची पापे धुऊन जातात. तो

स्वत: काही करत नाही, कर्ता करविता परमेश्वरच आहे असे मानतो. त्यांच्यात निरनिराळ्या जातीमुळे ते एकमेकावर प्रेम करीत नाहीत. ते एकमेकाशी मित्रधर्म कर देत नाहीत. जगापासून अलग करणारी बंधने त्यांच्यात खूपच आहेत. तेव्हा हिंदू धर्मातही ख-या धर्माची तत्वे नाहीत.

ख्रीस्ती धर्महि हिंदू व मुसलमान धर्माशी मिळता जुळता आहे. ते ईश्वराची दया स्वतंत्र आहे असे मानीत नाहीत म्हणून ते परमेश्वरावर प्रेम करीत नाहीत. पाप-पुण्यावर त्यांचा विश्वास नाही. ते शत्रुवेर प्रेम करीत नाहीत. नीतीचे आचरण करत नाहीत, आणि सर्व मानवावर कृपादृष्टी दाखवत नाहीत. जे ख्रिस्ती धर्म मानतात ते परमेश्वरावर व त्याच्या प्रजेवर प्रेम करतात. सर्वांवर दया व कृपाछत्र ठेवतात.

म्हणून धर्माचे तात्पर्य हे की, परमेश्वराचे मोठेपणा उघड करणे, म्हणून सर्व धर्म मानवाच्या मनात एकसारखी फळे उत्पन्न करतील तर सा-यांचेच कल्याण होईल.`

वरील पत्रातून पत्रकर्त्याने हिंदू, मुसलमान, आणि ख्रिश्चन धर्मातील असणारे मुख्य दोष दाखवून ख-या धर्माची तत्वे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. या पत्राकरून हे सिध्द होते की, प्रस्तुतच्या पत्रकर्त्याने तीन्ही धर्मांचा सुक्ष्मपणे अभ्यास केलेला असावा. त्याची सद्सद्विवेक बुध्दी सर्वसमावेशक वृत्ती आणि पुरोगामी विचार स्पष्ट होतातच. शिवाय उदाहरणासह आपले विचार पटवून देण्याची हातोटीही दिसून येते.

`दर्पण` मध्ये परमेश्वराच्या आस्तित्वाबद्दल आणि पापपुण्याबद्दल बरीच चर्चा झाली. तेच तेच विषय उगीच चघळण्याची वृत्ती तत्कालीन वाचकांमध्ये असलेली दिसून येते. २२ जून १८३२ च्या पत्रात ` हिंदु धर्म

ध्वंसक ` या गृहस्थाने ह.न.र. याच्या पत्राला उत्तर देऊन हिंदु व ख्रिस्ती धर्माच्या ग्रंथांची तुलना केली आहे. तो म्हणतो, ` ह.न.र.याने पुराणातील चंद्र सूर्य आणि ज्योतिषातील चंद्र-सूर्य एक नव्हेत असे म्हटले आहे. हे जर त्याने ग्रंथाच्या आधारे पटवून दिले तर मी त्याला एका श्लोकास एक सोन्याची मोहोर देईन. त्याने जे लिहिले आहे त्याला पुरावा नाही. ज्योतिष ग्रंथ हे पुराणापेक्षा अलीकडचे आहेत हा माझा सिध्दांत नसून सर्वसामान्य लोकांचे मत म्हणून लिहिले आहे. युरोपियन अभ्यासकांनीही या सिध्दांताला पुष्टी दिली आहे.`

प्रस्तुतचे पत्र एखाद्या निबंधासारखे विस्तृत असूनही बाळशास्त्रींनी त्याला आपल्या अंकात स्थान दिलेले आहे. बाळशास्त्र्यांनीसुध्दा ज्योतिष शास्त्राचा गाढा अभ्यास केलेला होता. त्यामुळे कदाचित या पत्रामुळे ज्योतिषशास्त्राविषयीचे आकलन जनसामान्यांना होऊ शकेल याच उदार वृत्तीतून त्यांनी मुद्दाम हे पत्र छापले असावे. प्रस्तुत पत्रकर्त्याने आपली मते आग्रहाने मांडून दुसऱ्यांची मते पुराव्यासहित खोडून टाकली आहेत. आपला एक विचार पटवून देण्यासाठी तर त्याने एका श्लोकास एक सोन्याची मोहोर देण्याची पैज लावली आहे.

६ जुलैच्या वाटसरूने लिहिलेल्या पत्रात "ख्रिश्चन धर्माची प्रमाणे" सांगण्यात आली आहेत. ` दर्पण ` कारांना तो लिहितो, ` आजपर्यंत तुमच्या कागदांत जे उपयोगी आणि चांगले वाद-प्रतिवाद दृष्टीस पडले, त्यात मी कोणाचाही पक्ष घेतला नाही, परंतु तुमच्या एका पत्रकर्त्याने म्हटले आहे की, धर्माविषयीचा वाद जरी कामाचा आहे तरी त्यापासून उभय पक्षास काही फायदा नाही. हे मला पटत नाही, म्हणून मी ख्रिस्ती धर्माचा खरेपणा काही गोष्टीवरून सिध्द करून दाखवतो. ख्रिस्ती धर्माचा ग्रंथ परमेश्वरापासून निर्माण झाला आहे. कारण

त्यातील चांगुलपणा, प्रौढपणा, निर्दोषावृत्ती, एकवाक्यता आणि सुसंगतपणा इतर धर्म ग्रंथापेक्षा श्रेष्ठ आहे. सर्व ग्रंथाचे एक लक्षण आहे की, मानवाचा कमीपणा, आणि ईश्वराचा श्रेष्ठपणा याची प्रतिष्ठा वाढवावी. त्यावर विश्वास ठेवून त्या मार्गाने गेल्यास तो पापापासून मुक्त होतो व पुण्याकडे लागतो व त्याच्या जीवनाचे सार्थक होते. हीच ईश्वराने सांगीतलेली धर्माची काही प्रमुख मुल्ये आहेत. आणि ही सर्व ख्रिस्ती धर्मग्रंथात आहेत. जे मनात द्वेषा बुध्दी न धरता, लक्ष आणि मन लावून, सुक्ष्मपणे हा ग्रंथ वाचतील त्यांना निश्चितपणे या ग्रंथाची सत्यता पटेल.`

रेसपांडेन्स हा गृहस्थ म्हणतो,` ख्रिस्ती धर्मात परमेश्वर एक आणि तो चांगला, सत्यशिल पवित्र असतो. हिंदु धर्मात परमेश्वर अनेक व त्यांनी बहुतेक सर्व पातके आचरण केलेली आहेत. असे असता हिंदु धर्म आणि ख्रिस्ती धर्म यांची मुल्ये आणि एकवाक्यता ही सारखीच कशी ?` या पत्राला उत्तर देताना इ.न.र. म्हणतो ` हिंदु व ख्रिस्ती धर्मात तेढ निर्माण करण्यासाठी अशा स्वरूपाचा मजकूर ख्रीस्ती लोक लिहितात,` काही उदाहरणे देऊन प्रस्तुतपत्रकर्त्याने आपले विचार मांडले आहेत.

२० जुलै १८३२ च्या पत्रात म्लेंच्छ याने त्रयस्थाच्या दृष्टिकोणातून हिंदू व ख्रिस्ती धर्माचे समर्थन केले आहे. जे चांगले आहे त्याचे गुण गाणे आणि जे वाईट आहे त्याला झिडकारणे अशी याची वृत्ती आहे. `दर्पण` कारांना काही सूचनेखातर तो म्हणतो, ` तुमच्या पत्राचे नाव `दर्पण` हे आहे. कोणत्याही चेहऱ्यावरील खुणा, डाग दर्पणामुळे दिसून येतात. कदाचीत `दर्पणा` ने एक मनुष्य याचे तोंडावरील डाग

दाखविल्यामुळे त्यास राग आला असेल. परंतु त्याची फिकीर न करता आपली वृत्ती जोपासण्याचा प्रयत्न करा.'

डॉ. वाल्मी सारख्या ख्रिस्ती गृहस्थाने कोणत्याही धर्माचा उल्लेख न करता परमेश्वर आहे याविषयी आपले विचार उदाहरणांनी पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. तो म्हणतो,' सृष्टीची निर्मिती करणारा अदृष्ट प्राणी अनादीकाळापासून आहे. तो डोळ्यांनी दिसण्यास किंवा अनुभवास येण्यास अशक्य आहे. ज्याप्रमाणे उष्णता आणि प्रकाश यांच्या कार्याच्या आणि अनुभवाच्या आधारे कोणीतरी आहे हे आपणास मान्य केले पाहिजे. जर घड्याळ नित्यनियमाने चालून आपले कार्य करते, त्या कार्याचा नियम करणारी कला माणसानेच निर्माण केली. अशाच पध्दतीने सूर्य, चंद्र आणि अंतराळातील तारे नियमीत काळी भ्रमण करतात. जसे कच्च्या खनीजापासून त्याचे स्वैर पार्ट आपोआप होतील, आणि त्यापासून आपोआप नियमीत चालणारे यंत्र घडले जाईल हे मानणे जसे असंभाव्य तसेच अंतराळातील जहामध्ये दिवस-रात्र किंवा दिवस, महिने, वर्षे ही पुन्हा पुन्हा येतात. यामध्ये जो आश्चर्यकारक बंदोबस्त असतो तो कुणीतरी निर्माण केल्यावाचून होतो असे मानणेही असंभाव्य आहे. ईश्वराच्या शक्तीवाचून विश्वाची निर्मिती झाली ही कल्पना केवळ नियुक्तिक आहे. जशी दगडाची खाण, मातीचे ढीग, आणि जंगल यांची मानवाच्या कौशल्या वाचून सुशोभित इमारत होऊ शकेल ही कल्पना, अथवा जी आमची आश्चर्यकारक, शरीरे ही वास्तवता, तेव्हा ईश्वराच्या सामर्थ्यावाचून जग निर्माण झाले आहे असे म्हणता येत नाही. सूर्य, पाऊस, पृथ्वी ह्या शक्ती उघड उघड आपणास दिसतात. सृष्टीच्या उत्पत्तीपासून अदृष्य गोष्टी स्पष्ट दिसतात त्या परमेश्वराने निर्माण केल्या आहेत. म्हणून त्या अनंत शक्ती म्हणजे परमेश्वर.' हे पत्र सुध्दा

खूपच विस्तृत असून डॉ. वाळपी सारख्या ख्रिस्ती गृहस्थाने परमेश्वराचे अस्तित्व आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

धार्मिक स्वरूपाच्या पत्रव्यवहारामध्ये परमेश्वर आहे किंवा नाही, जातीयता, आणि धार्मिक मूल्ये यावरच ब-याच पत्रकर्त्यांनी पत्रे लिहिली आहेत. एकमेकांच्या धर्मावर किंवा विचारावर आघात करणे आणि आपलाच धर्म किंबहुना विचार कसा श्रेष्ठ आहे हे पटवून देणे, प्रसंगी टोकाची भूमिका घेणे अशा स्वरूपाचे प्रकार या पत्रकर्त्यांच्यामध्ये असलेले दिसून येतात. त्याच त्याच पत्रांना `दर्पण` ने स्थान दिलेले आहे. पाप, पुण्य आणि परमेश्वर आहे की नाही या विषयांची पत्रे खूपच आढळतात. तत्कालीन सनातन्यांचे प्रतिगामी विचार आणि सुधारकांचे पुरोगामी विचार कसे होते याचा उलगडा होतोच; शिवाय धर्मातील दुष्ट प्रवृत्ती काळानुसार बदलल्या पाहिजेत आणि धर्माची मूल्ये अखंड मानव जातीस उपयोगी ठरतील अशीच असावीत हा मतप्रवाह हळू हळू रूढ झालेला दिसून येतो. `दर्पण` मध्ये जो धार्मिक वाद पत्ररूपाने वाचकांसमोर मांडला त्यातून धार्मिक चळवळीस प्रोत्साहन तर मिळालेच शिवाय खरा धर्म कोणता याची जाणही वाचकांना करून दिली.

सामाजिक
--------

`दर्पण` कारांनी धार्मिक पत्रव्यवहारापेक्षा सामाजिक पत्रव्यवहाराला अधिक महत्व दिले आहे. त्या पत्रातून तत्कालीन काळात निर्माण झालेला जातिभेदाचा प्रश्न, स्त्री शिक्षणासाठी प्रयत्न, स्त्री-पुरूषा समान हक्क, दुष्ट चालीरीतीवर हल्ला, विधवांच्या समस्यावर तोडगा, व्यसनावर टीका, गायकवाडांचा बंदोबस्त, यासारख्या

नानाविध गोष्टीवर वाचकांनी लिहिल्याचे आढळते. जे ज्वलंत प्रश्न आहेत त्यावर तरी खूपच मतप्रदर्शन झाले. या पत्रव्यवहारावरून तत्कालीन समाज मन आणि एकंदरीत सामाजिक परिस्थितीचे भान लक्षात येते. सुधारकांचा सुधारक दृष्टिकोण कसा प्रबळ होत गेला आणि हिंदुस्थानातील सामाजिक परिस्थितीमध्ये बदल कसे कसे होत गेलेत याचे प्रत्यंतर या पत्रावरून दिसून येते. `मनुष्य जातितील भेद` या शीर्षकाखाली मानव वंशाच्या दृष्टीने जगातील सर्व जाती धर्मांच्या लोकांची माहिती एतद्देशीयांना करून देण्याचा प्रयत्नही पत्रकर्त्यांनी केलेला आहे. थोर आणि कर्तृत्ववान व्यक्तींच्या कार्याचे गुणाविशेष सांगून आशा महान व्यक्तीची देशाला प्रगतीपथाकडे नेण्यास खूप गरज आहे हे पत्रकर्त्यांनी वाचकांच्या मनावर बिंबविले आहे. एकंदरीत हिंदुस्थानी लोक आणि पाश्चात्य राज्यकर्ते यांच्या प्रयत्नातून घडून येणारा नवा समाज आणि त्याविषयीचे जनतेचे मतप्रदर्शन या पत्राव्यवहारातून स्पष्ट दिसते.

### १ पुनर्विवाह

परशुराम शेत्रस्थ ब्राह्मण याचे १५ ऑगस्ट १८३७ च्या अंकात प्रसिध्द झालेले `पुनर्विवाह प्रकरण` नावाचे लेखवजा विस्तृत पत्र खूपच महत्वाचे आहे. विशेष म्हणजे एवढ्या मोठ्या पत्राला बाळशास्त्र्यांनी `दर्पण` मध्ये स्थान दिले. या पत्रामधून पत्रकर्त्यांची दिसून येणारी सुधारक वृत्ती, त्यांचा सडेतोडपणा, त्यांची सद्सद्विवेक बुध्दी, स्त्रियाविषयीची आत्मीयता आणि जुन्या वाईट प्रवृत्ती समूळ नष्ट करण्याची प्रबोधनाची दृष्टी दिसून येते. धार्मिक ग्रंथांचा आधार घेऊन आणि संस्कृत श्लोकांचे विवरण करून आपले विचार अत्यंत

काटेकोरपणे प्रस्तुत पत्रकर्त्याने मांडले आहेत. सारांश रुपाने ते पत्र असे होते, ' हिंदुस्थानातील बालविधवांच्या दुष्कर्माची पाळेमुळे खणून टाकावी. कारण हे सर्वव्यापी दुराचरण पाहून आमचे मन ब-याच दिवसापासून व्याकूळ होत होते. ते स्वाभीप्राय प्रकट करावे असेही वाटत होते. परंतु एकट्याने कोणतीही गोष्ट सिध्दिस जात नाही त्यास आवश्यकता असते संघशक्तीची. काही वर्षांपूर्वी व्यंकटराम शास्त्री याने या पुनर्विवाहावर आवाज उठविला होता, त्यावेळी समाजाने त्याला वाळ्यात काढले आणि बहिष्कृतही केले. परंतु या निंद्यप्रकारा-विरुध्द ' दर्पण ' मध्ये पुन्हा आवाज उठविलेला पाहून आणि दक्षिणेत बाळाजीपंत नातू यानेही याविरुध्द आवाज उठविल्यामुळे आणि आमच्या मित्रांनी आम्हास आधार दिल्यामुळे यावर मी लिहित आहे.

विधवा स्त्रियांना अ:धपतनाकडे नेण्यास विद्येचा अभाव आणि लग्न करण्याची मनाई ही दोन कारणे आहेत. यासाठी स्त्रियांना विद्या शिकवावी. चांगले शास्त्र, पतिसेवादी धर्म, नीति यासारखे शिक्षण दिल्यास या वाईट प्रवृत्तीस आळा बसेल. चांगल्या शिक्षणाने स्त्रिया सुसंस्कारीत, सुशिल आणि विचारी बनतील. साहजीकच त्या वाईट प्रवृत्तीकडे आकर्षित होणार नाहीत.

लहानपणी मुलींचे लग्न करण्याची प्रथा बंद केली पाहिजे. विधवांना पुनर्विवाहाची परवानगी दिली पाहिजे. पूर्वी विधवांचा पुनर्विवाह होत असे. पण अलीकडे धर्माचा बंदोबस्त ठेवण्यासाठी विद्वानांनी त्यांच्या विवाहास बंदी घातली. वास्तविक स्त्री पुरुषापेक्षा अधिक हुशार, व्यापारात पुरुषापेक्षा वरचढ, आणि अधिक कष्टाळू असते. त्यामुळे स्त्रियांना शिक्षण द्यावेच. पूर्वी रुक्मिणी, दमयंती, पार्वती यांना लेखन पठन करता येत होते. सुशिक्षित, सुजाण स्त्रिया सर्वांना

आवडतात. लहानपणीच मुलींची लग्ने करण्याची प्रथा बंद करून स्त्री-पुरुषा संबंध योग्य होईल तेव्हाच त्यांचा विवाह करावा.`

वरील ` पुनर्विवाह प्रकरणा ` वरून तत्कालीन स्त्रियांचा प्रश्न किती गंभीर स्वरूपाचा होता आणि त्या प्रश्नाची उकल करण्याचा प्रयत्न कसा केला आहे याचे दर्शन घडते.

स्त्री-शिक्षण
-----------

पिढयान पिढया खितपत पडलेल्या स्त्रियांना शिक्षण दिल्याशिवाय समाजसुधारणा होणार नाही हे जसे सुधारक सांगू लागले तसे स्त्री शिक्षणाचे महत्वही समाजाच्या लक्षात येऊ लागले. यासंबंधी वाचकांच्या ब-याच प्रतिक्रिया ` दर्पण ` कडे आल्या. ` सध्या स्त्रीयांची जी दुर्दशा झाली आहे त्यावर प्रतिबंध घातला पाहिजे. मुलांना शिकविण्याच्या कामी स्त्रीच उपयोगी पडू शकेल. त्यामुळे पहिल्यांदा स्त्रीस शिक्षण द्यावे` अशा स्वरूपाचे विचार म.म.स.याने व्यक्त केलेले आहेत.

३० मे १८३४ च्या पत्रात ` स्त्री शिक्षणाची दीशा ` याबाबत विचार मांडले आहेत. ` दर्पणा `त स्त्री शिक्षणाविषयी लिहिलेले पाहून आनंद वाटला. स्त्रियांना शिकविणे आजच्या काळात आवश्यक आहे. सर्व लोक धर्म, नीति, कलाकौशल्ये आणि विद्या आपल्या मुलाला देण्याचा प्रयत्न करतात. परंतु मुलांवर लक्ष ठेवणे आणि कोवळ्या मनावर संस्कार करणे हे जिचे कर्तव्य आहे ती मात्र अज्ञानात गुरफटली आहे. अलीकडे मॅजीस्ट्रेटसारख्या उच्च पदावर असलेल्या मंडळीनी मुलींना किंवा स्त्रियांना शिक्षण देण्याची प्रथा आपल्यात नाही म्हणून नकार दर्शविला आहे. परंतु त्यांची ज्यावेळी उच्चपदावर नेमणूक झाली त्यावेळी

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

का बरे आपल्याकडे प्रथा नाही म्हणून नकार दिला नाही ? स्त्रीच्या शक्तीचा अजून साक्षात्कार समाजाला झाला नाही. त्यांना एकवेळ बंदीवासातून मुक्त करा, त्यांना विचार करू द्या, शिक्षण घेऊ द्या, त्यांच्या सुखाचा त्यांना आस्वाद घेऊ द्या. तेव्हाच तुम्हास स्त्रीची शक्ती कळून येईल. स्त्रियांना देखील मान, प्रतिष्ठा मिळाली पाहिजे. तरच ती इंग्रजी स्त्रीसारखी ताठ मानेने चालू शकेल.'

स्त्री शिक्षणाचा समर्थक विचार वरील पत्रात मांडला आहे. तर कित्येक ' हिंदु चाली बऱ्या व्हाव्या ' या विषयी एक ' उत्कंठीत ' या नावाने पत्र लिहिलेल्या गृहस्थानेही अशीच भूमिका घेतली आहे, तो म्हणतो, ' स्त्रीयांना शिक्षण देणे हे मला पटते. बऱ्याच जणांना स्त्रियांस शिक्षण देणे म्हणजे वाईट मार्गाला लावणे असे वाटते. परंतु त्यांची ती कुल्पट कल्पना आहे. त्यांना वाटते शिक्षणाने स्त्री कठोर बनेल, दुष्ट होईल. मला आश्चर्य वाटते की त्यांना शिकविणे म्हणजे लावण्य किंवा दुसऱ्या काही शृंगारीक पुस्तकांची माहिती करून देणे. परंतु तसे नसून नीति, आचारसंहिता दृढ होण्यासाठी शिक्षण दिले पाहिजे.' याच संदर्भात एक गृहस्थ लिहितो, ' एखादा माणूस दूरदेशी जातो आणि तेथून आपल्या पत्नीला पत्र पाठवतो. पण त्या स्त्रीला पत्र वाचता न आल्यामुळे ते दुसऱ्या कडून वाचून घ्यावे किंवा तसेच पत्र लिहून घ्यावे लागते. परंतु तीने स्वत:च लिहिले असते तर प्रेमाच्या नाजूक गोष्टी व व्यक्तिगत लिखाण ती करू शकली असती. म्हणून स्त्री शिक्षणाची अत्यंत गरज आहे.'

४ जुलै, १८३४ च्या पत्रात स्त्री शिक्षणासंबंधी प्राचीन दृष्टांत दिला आहे. तो लिहितो, ' स्त्रियांनी विद्या, कला शिकाव्या याविषयीचे दृष्टांत व्योम संहितेत दिले आहेत. यज्ञाचेवेळी अग्नीस आहुती

देतेवेळी वेद मंत्र म्हणावे लागतात. हे काम स्त्री करत होती. देवादिकांच्या स्त्रियाही अधिकारी होत्या. त्यामुळे स्त्री शिक्षणाबद्दल कुणीही मनात संदेह बाळगू नये.`

तत्कालीन काळात स्त्री शिक्षणासंबंधी प्राचीन - अर्वाचीन विचारांची मत प्रदर्शने `दर्पण` मध्ये दिसून येतात. या पत्रव्यवहारानेच स्त्री शिक्षणाच्या चळवळीस उत्तेजन दिले असे म्हटले तर ते चुकीचे ठरू नये.

स्त्री पुरुषा समान हक्क
-----------------

` संसार सुखाचा व्हायचा असेल तर बायको विचारी, सुशिल व सुसंस्कारीत असावी लागते. परंतु या देशातील चाल याविरूध्द आहे. समज न येताच, त्यांच्या आवडी व स्वभाव न पाहताच लहान मुलींची लग्ने लावली जातात. त्यामुळे याचा परिणाम दोघावरही होतो. ही पध्दत बंद करून दोघांनाही समज आल्यावर मनास वाटेल त्याप्रमाणे बायका किंवा नवरा पसंद करावा. एकमेकाचे परस्परावर प्रेम असेल, दोघेही शिक्षित असतील तर संसारात सुख वाटते. त्यामुळे स्त्रीला शिक्षण देणे गरजेचे आहे. ती देखील इंग्रजी स्त्रीसारखी स्वतंत्र राहू शकली पाहिजे. तीला देखील समाजात मान, प्रतिष्ठा मिळाली पाहीजे. पुरुषाबरोबर ताठ मानेने वावरू शकली पाहिजे. कोणतेही बंधन तिच्यावर असता कामा नये. पुरुषानेही तीला मोकळीक द्यावी. एवढेच नव्हे तर तीला समान हक्क द्यावेत.` अशा स्वरूपाचे व्यापक विचार काही पत्रकर्त्यांनी व्यक्त केलेले आहेत.

जातिभेद

ज्याप्रमाणे तत्कालीन पत्रकर्त्यांनी `दर्पण` मधून विधवा विवाह, स्त्रिशिक्षणाचे समर्थन केलेले आहे त्याचप्रकारे जातिभेदाच्या दुष्ट चालीविरूध्द आवाज उठविला आहे. यामध्येसुध्दा काही प्रतिगामी विचाराची आणि पुरोगामी विचाराची माणसे आहेत. ह.न.र. या प्रतिगामी विचाराच्या पत्रकर्त्याने मनुष्याच्या जातिभेदाचे समर्थन केलेले आहे. तो म्हणतो, `कलकत्यातील कित्येक हिंदूनी शास्त्राप्रमाणे मानवामध्ये जातीचा आणि धर्माचा भेद नसावा असे म्हटले आहे. परंतु मी म्हणतो इंग्रजीमध्ये `क्यास्त`, प्राकृतमध्ये `जात `आणि संस्कृत-मध्ये `ज्ञान` असे म्हटले जाते. हे शब्द पृथ्वीवरील सा-या भाषात उत्पन्न झाले. ख्रिस्ती आणि नवीन विचाराचे हिंदू यांच्या मताप्रमाणे त्या शब्दाचा वाच्य पदार्थच कोठे नाही. परंतु माझे असे म्हणणे आहे की, पशु, पक्षी, झाडे, वेली, मृत्तिका आणि विश्वात जितके पदार्थ आहेत त्यात जशा जाती आहेत मग मनुष्यातच का नसाव्या ?`

वरील पत्रकर्त्यास उत्तर `एक मनुष्य` नावाने पत्र लिहिणा-या गृहस्थाने दिलेले आहे व मानवामध्ये जातीच नाहीत असे सिध्द केलेले आहे. तो म्हणतो, `पशुपक्षामध्ये जाती आहेत मग माणसामध्ये का नसाव्या असे असेल तर त्या गाढवामध्ये का नसाव्या? मानवाची जात एकच आणि सर्व माणसे एकाच बीजापासून निर्माण झाली.` याच पत्रात दुसरा एक पत्रकर्ता म्हणतो, `प्राण्यात जाती आहेत हे मान्य पण एक कोंबडा दुस-या बरोबर खात नाही किंवा रहात नाही असे मी कधी पाहिले नाही. किंवा ज्या भांड्यातील पाणी कोकणातील कुत्रा प्याला आहे त्याच भांड्यात इतर देशातील कुत्रे पीत नाही असे मी पाहिले नाही. तेव्हा मनुष्यामध्ये जात नाही. सर्व माणसे सारखीच असतात.`

`मनुष्य जातीचे भेद` यामध्ये चिनी, जपानी, आशियाई, व युरोप खंडातील सर्व देशातील लोकांचे सूक्ष्म अवलोकन केलेले आहे. त्यांचे राहणीमान, तेथील प्रदेश, त्यांचा स्वभाव, आवडी निवडी, त्यांची शरीरे यांचे ज्ञान पत्रकर्त्यांनी एतद्देशियांना करून देण्याचा प्रयत्न केला आहे.

इतर पत्रे
-------

वरील धार्मिक आणि सामाजिक पत्रव्यवहाराव्यतिरिक्त काही प्रासंगिक पत्रेही आढळतात. कलकत्यामध्ये हुक्का ओढण्यासारखे व्यसन किती फैलावले आहे याचे ज्ञान करून दिले आहे व व्यसन शरीरास किती घातक आहे हेही सांगितले आहे. शिवाय, पारशी समाजातील झालेले आंदोलन, मुंज मुलींची का नाही? या स्वरूपाची पत्रे आढळतात. पार्लमेंटात सुधारणा विषयक जे बदल झाले त्या राजकीय घटनांचा साद-पडसाद या पत्रव्यवहारामधून समजतो. तर राजा राममोहन रॉय सारख्या बुध्दिवान व्यक्तींच्या कार्याचा आढावा घेणारी आणि त्यांच्या गुणाचे महत्व सांगणारी तीन पत्रे पत्रकर्त्यांनी पाठविलेली आहेत, ती `दर्पण` कारांनी छापली आहेत. एकंदरीच समाजातील सर्व प्रश्नावर आणि त्याकाळी होत असलेल्या उलाढालीवर पत्रव्यवहार झालेला दिसून येतो.

बाळशास्त्र्यांच्या `दर्पण` ने वाचकांच्या पत्रव्यवहाराचा जो पायंडा पाडून दिला तो आजतागायत प्रत्येक नियतकालिकामध्ये असलेला दिसून येतो. वाचकांच्या पत्राकरून पत्रात कोणत्या विषयाला स्थान द्यावे, वाचकांची अभिरूची कशी आहे याचे सम्यक आकलन होते आणि पत्र चालविण्यास सुकर होते. आजच्या काळात वाचकांची पत्रे

नांव गाव यासहीत प्रसिध्द होत असली तरी `दर्पण` मध्ये ती ठराविक नावाने किंवा टोपणनावाने प्रसिध्द झालेली दिसून येतात. `एक मनुष्य,` `ई.न.र.,` `द.र.,` `हिंदुंचा मित्र,` `मनुष्याचा मीत्र,` `हिंदु धर्म ध्वंसक,` `वाटसरू,` `म्लेंच्छ` `सत्यशोधक` अशा सांकेतिक नावाने वाचकांनी पत्रव्यवहार केल्याचे आढळते. एकंदरीत या पत्रव्यवहारामुळे सामाजिक समस्यांची उकल झाली, जनजागरण झाले आणि सामाजिक सुधारणेच्या कार्याला गती मिळाली.

## समारोप :

बाळशास्त्री जांभेकरांनी मराठी वृत्तपत्र सृष्टीचा श्रीगणेशा करून `दर्पण` वृत्तपत्राला मानाचे स्थान मिळवून दिले. त्यातून त्यांची अष्टपैलू बुध्दिमत्ता, समाजोध्दाराची दृष्टी, स्वदेशोन्नतीची कळकळ, आणि त्या काळाच्या मानाने असणारा प्रगल्भ दृष्टीकोन दिसून येतो. जीवन विकासाचे आणि सामाजिक उन्नतीचे प्रमुख साधन जे शिक्षण त्याचा अंगिकार करण्यास जनतेला भाग पाडले. `विद्या हे बळ आहे` असे सांगून शिक्षण कार्यात जेवढी मदत करता येईल तेवढी त्यांनी केली. समाजजागृतीसाठी, आणि ज्ञानदानासाठी नियतकालिकाचा वापर करून जनतेपुढे पुरोगामी विचार मांडून प्रबोधन केले. रूढी, परंपरा, खुळचट कल्पना, अंधविश्वास यांवर `दर्पण` मधून हल्ला चढवला. विज्ञानाचे महत्व पटवून देऊन पाश्चात्य राष्ट्रात चाललेले नवनवीन शोध एतद्देशी-यांना सांगितले. पाश्चात्य लोकांची जिज्ञासू वृत्ती, संशोधक दृष्टी, धाडस आणि ज्ञानलालसा एतद्देशीयांनी स्वीकारावी म्हणून प्रयत्न केला. प्रसंगी देशातील पूर्वाभिमान सांगितला आणि मनातील न्यूनगंड काढून

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY

टाकण्यास भाग पाडले. थोर, आदर्श, विचारवंतांचे दाखले त्यांचे विचार, ग्रंथकारांची मते `दर्पण` मधून मांडली. श्रेष्ठ ग्रंथाची परीक्षणे करून वाचकांची अभिरुची व्यापक बनविली. सरकारमध्ये किंवा इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये होणारे बदल, नवीन कायद्यांची जाण एतद्देशीयांना करून दिली. बाळशास्त्र्यांनी सरकार व जनता यांच्यामध्ये मध्यस्थाची भूमिका बजावली. सुधारणेच्या कामी जनतेमध्ये जागृती तर केलीच शिवाय सरकारला ठोस पावले टाकण्यास भाग पाडले. व्यापाराचे महत्व पटवून दिले, कलाकौशल्ये उद्योग याविषयी लेखन केले. शेतकऱ्यांच्या समस्यावर सरकारला उपाय सुचवून दिले. राज्यकारभारातील दोष सरकारच्या आणि जनतेच्या दृष्टीस आणून दिले. धर्मासंबंधी उदात्त हेतूने लेखन केले. सांस्कृतिक बाबतीतही आपले मत मांडले. आर्थिक बाबींचा विचार करून बँकेची निर्मिती करण्यास सुचविले. जगामधील घडणाऱ्या गोष्टींचे साद-पडसाद `दर्पण` मध्ये उमटविले. एकंदरीत `दर्पण` मध्ये बाळशास्त्र्यांनी चौफेरपणे लेखन केलेले आहे. स्वदेशाभिमान, स्वदेशोन्नती, याकडे विशेष लक्ष देऊन लोकांना कार्यप्रवण केले. बाळशास्त्र्यांच्या विचारांचा आवाका काळाच्या मानाने खूपच मोठा आहे. `दर्पण` मध्ये त्यांनी केलेले लेखन सामाजिक उन्नतीसाठीच होते. राष्ट्रीय विचारांची ठोस बैठक त्याच्या पाठीमागे होती. त्याचे सम्यक् आकलन एतद्देशीयांना करून देणे हाच प्रेरक हेतू `दर्पण` चा होता. स्वातंत्र्याची जाणीव झालेला पहिलाच पुरुष म्हणजे बाळशास्त्री जांभेकर, इंग्लंडमधील स्वातंत्र्याच्या घटना हिंदुस्थानी लोकांना सांगत असताना म्हणतात, `ज्या गोष्टी पासून तेथे बरे वाईट होईल तसेच येथे होवो.` म्हणून हिंदुस्थानातील `चलेजाव` चळवळीचे पुरस्कर्ते आणि द्रष्टे विचारवंत म्हणून त्यांच्याकडे पाहिले पाहिजे. महाराष्ट्रालाच नव्हे तर हिंदुस्थानाला प्रगतीपथाकडे नेण्याचे

कार्य स्वत:च्या कृतीने आणि उक्तीने बाळशास्त्रींनी केले हे निर्विवाद. यासाठी तर त्यांनी `दर्पण` ची निर्मिती केली. म्हणून `दर्पण` ने १९ व्या शतकाच्या प्रारंभी अविस्मरणीय आणि उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्याचे महत्व नि:संशय मोठे आहे.

...

## प्रकरण तिसरे

### - संदर्भ टीपा -

१) वि.कृ.जोशी, श्री.म.सहस्त्रबुध्दे (सं.), दर्पण संग्रह, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, पृ. ३.

२) तत्रैव, पृ. ४, ५.

३) ग.गं. जांभेकर (सं.) आचार्य बाळशास्त्री जांभेकर :जीवनवृत्त व लेखसंग्रह, लोकशिक्षण, पुणे, १९५७, खंड २, पृ.५६, ५७.

४) तत्रैव, पृ. ४९.

५) तत्रैव, पृ.२९.

६) तत्रैव, पृ. २९.

७) तत्रैव, पृ. २९, ३१.

८) तत्रैव, पृ. ६१.

९) तत्रैव, पृ. ७१.

१०) तत्रैव, पृ.७५.

११) तत्रैव, पृ.१०७.

१२) तत्रैव, पृ.१३.

१३) अ.का.प्रियोळकर, चलेजाव चळवळीचे द्रष्टे कै.बाळशास्त्री जांभेकर, मनोहर, १३-१४९, जुलै १९४६ पृ. २६६.

१४) ग.गं.जांभेकर (सं.), आचार्य बाळशास्त्री जांभेकर : जीवनवृत्त व लेखसंग्रह, लोकशिक्षण, पुणे, १९५. खंड २, पृ.६३.

१५) तत्रैव, पृ. ४३.

१६) वि.कृ.जोशी, श्री.म.सहस्त्रबुध्दे (सं.), दर्पण संग्रह, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, पृ.७.

...